जि. ... १८

किरकोळ ... हास ............... ०४

Single copy...........................

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 4 MARCH 1895 — NO. 9

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख ४ माहे मार्च सन १८९५ इ० — अंक ९

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धाशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहा वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केजर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, स्लाटर हाऊसचा, कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, व स्टेशन धर्मशाळेचा कर वसूल करण्याचे हक्काचा लिलांव सन १८९५।९६ सालाचा तारीख १८ माहे मार्च सन १८९५ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत होणार आहे ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हू तारखेस हजर होण्याचे करावें. कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी.

Md. Husain
Secretary
A. M. C.

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त, हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत [ उच्चारासह ] जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खाताने पसंत केलेले किंमत. ०।०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## मनुष्याची साधारण प्रवृत्ती

"Blest work! if ever thou wert
curse of God
What must His blessing be!"
I. B. Selkirk.

मनुष्य एखादें मेहनतीचें काम करीत असला ह्मणजे त्यास विसावा केव्हां मिळेल असें होतें, व थोडा वेळ लागलींच विसावा मिळाला तर जास्त वेळ आणखी विसावा मिळेल तर बरें असें त्यास वाटूं लागतें. कदाचित तितकाही विसावा त्यास मिळाला अशी कल्पना केली तर त्याचे आळसास जास्तच प्रोत्साहन मिळून आपल्यास काम मुळींच न पडतां रोजचे रोज असेंच स्वस्थ पडून रहावयास मिळालें तर किती आनंद होईल असें त्यास भासावयास लागतें परंतु ही त्याची हाव फार वेळ टिकाव धरून राहत नाहीं. कारण स्वस्थ पडून राहण्याची चीज मेहनती शिवाय होत नाहीं हें त्यांचे सल्लद्दष्टीनें ध्यानीं येत नाहीं. पूर्वी इंडिया ऑफिस मध्यें चार्लस लँब नांवाचा एक क्लार्क असे. त्यास रोजचेच रोज ऑफिसांत लिहिण्याचें काम अतिशय पडे. त्या मुळें तो आपल नोकरीस अगदीं कंटाळून गेला. शेवटीं त्यानें त्रासून नोकरीही सोडली. ते वेळीं त्यानें आपले मित्रास एक पत्र लिहिलें. त्यांत त्यानें "मला जर कोणी आज दहा हजार रुपये बक्षीस द्यावयास तयार झाला तर निदान आणखी दहा वर्षे तरी त्या बंदीखान्याकडे ( ऑफिसाकडे ) ढुंकून पाहणार नहीं! वा: आज मला किती तरी मोकळें वाटतें. जशी हवा इकडून तिकडे स्वैरपणें वावरते तसा आतां मी झालों. अहाहा, माझ्या विसाव्यांतील थोडासा भाग मला जर या प्रसंगीं तुला देतां आला असतां तर मोठी मौज झाली असती! आतां मला आणखी पन्नास वर्षे तरी निदान जगतां येईल. खरोखर, जगांत मनुष्याचे नशिबीं ज्या कांहीं उत्तम गोष्टी मानल्या जातात त्यांतीलच "कांहींच न करितां स्वस्थ पडून राहणें" ही एक गोष्ट आहे" अशा आनंदांत चार्लस लँब यानें पहिलें वर्ष कसेंबसें स्वस्थ पडून केवळ झोंप घेण्यांत घालविलें. परंतु दुसरे वर्षीं उत्तरोत्तर झोंप येईनाशी होऊन तिचा कंटाळा येत चालला. वेळ जाईना. त्या मुळें प्रकृति दिवसेंदिवस अस्वस्थ होत चालली. तेव्हां चार्लस लँब यांचे मतांत थोडथोडा फरक पडत चालला. होता होता शेवटी तर इतक्या थरास मसलत जाऊन पोंहचली कीं, पुन्हां त्यानें आपले मित्रास लिहितांना लिहिलें "काय सांगावें! जी वेळ मला पूर्वी एखाद्या जिवलग मित्रा प्रमाणें वाटत होती ती आतां शत्रुवत भासते. खरोखर पुष्कळ काम करतां करतां एकपरी शीण आलेला पुरवला पण हें स्वस्थ बसणें नको! आतां तर जणु काय मनच मनास खावयास लागलें आहे असें वाटतें. साधारण गोष्टींची काळजी ही तर कशी असते याची कल्पनाही नाहींशी झाली आहे. छे: तो आपला पूर्वीचा कामाचा रहाब बरा होता!!" यावरून मनुष्य कांहीं तरी उद्योगांत नेहमीं गुंतला गेला पाहिजे हें उघड आहे. लॉर्ड रस्यान्ले यांनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं "निरुद्योगी मनुष्य कितीही मनमिळाऊ व सभ्य असो त्यास खरें सुख ह्मणून प्राप्त होणार नाहीं. कारण ज्या अर्थीं मनुष्याचें खरें जीवित उद्योग हें आहे त्या अर्थीं तो रोजची कालक्रमणा कशी करतो हें जर मला कळेल तर तो कशा पद्धतीचा आहे हें मी तेव्हांच दाखवीन." मनुष्यानें नें आपल्यास नेहमीं आवडतें असाच उद्योग करण्याचें हातीं घ्यावें ह्मणजे त्यास कंटाळा अथवा शीण वाटणार नाहीं. कित्येकांस असें वाटतें कीं एखादा उद्योग अथवा मेहनत करण्या पेक्षां आपल्याच मनांतील एखादे विचारांत मग्न होउन स्वस्थ पडून राहावें ह्मणजे झालें. परंतु हें वरील गोष्टी प्रमाणेंच केवळ भ्रान्तिमूलक आहे. उलट याचे पासून फारच अनर्थावह परिणाम होतील. मनुष्यानें कितीही यत्न केला तरी काळजी वे मेहनत यांस कधींही त्याला विन्मुख होतां येणार नाहीं. परमेश्वरानें जन्मतःच तीं त्याचे नशिबीं जखडून टाकिलीं आहेत. त्रास नको ह्मणून जो भिऊन दूर दूर पळतो त्याचे कडे उलट त्रास स्वतः धावून जातो. जगांत प्रत्येक मनुष्यास आपले नित्य आयुष्यक्रमा करितां जी कांहीं मेहनत करणें अथवा त्रास सोसणें अवश्य आहे, त्यांतील कांहीं भाग कमी करण्याचे उद्देशानें जर एखादा आळशी मनुष्य प्रयत्न करील ईश्वरी सूत्र असें कांहीं विलक्षण आहे कीं त्याचें बुद्धीस

केवळ अमाच जो एखादा श्रमाच्या भाग त्यानें उचलला असेल तोच त्यास अधिक वाटून तो पूर्णतेस नेतां नेतां त्यास पुरे वाट होईल. नेपोलिअन बोनापर्ट यास तर अशी संवय असे कीं त्यानें जेव्हां जेव्हां एखादें उत्कृष्ट मेहनतीचें काम पहावयास जावें तेव्हां तेव्हां त्यानें तें काम करणाराचा मोठा आदरसत्कार करावा व जाते वेळीं त्यास लवून मुजरा करावा. एके समयीं सेंट हेलिना येथें नेपोलिअन व मिसेस बाल्कोम हे उभयतां रस्त्यानें बोलत चालले असतां दुरून त्याच वाटेनें कांहीं लोक मोळ्या घेऊन येत होते. त्यांस पाहातांच बाल्कोम हिनें त्या लोकांना दूर करण्याविषयीं मोठ्या रागानें चाकरांस हुकूम केला. तें पाहून नेपोलियन ह्मणाला "लोकांस दूर करण्याचें कारण नाहीं, उलट याचे मेहनतीस आपण मान्यता दर्शविली पाहिजे" कोणत्याही समाजाचे चांगुलपणास अशाच लोकांचे परिश्रम कारणीभूत असतात. चीनचा एक बादशाहा तर असें ह्मणत असे कीं राज्यांत जर एखादा उद्योग न करणारा पुरुष अथवा एखादी उठवळ बायको आढळली तरी त्यांचे ऐवजीं दुसरा कोणी तरी भुकेला अथवा तापानें ग्रस्त झालेला मनुष्य राज्यांत कोठे तरी असला पाहिजे असें समजावें." त्या बादशहाचा हा समज आमचे हिंदुस्थान देशास तर अक्षरशः लागू पडेल. कारण आह्मा लोकांची बहुतेक प्रवृत्ति आळशा कडेसच फार आहे. आह्मास मेहनत ह्मणून नको. सर्व कांहीं आयतें पाहिजे. मेहनत करणारा मनुष्य कमनशिबाचा आह्मी समजतों. आमच्या या नादान समजुती ज्या दिवशीं पूर्णपणें लयास जातील तो सुदिन !

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती फाल्गुन शुद्ध ८ शके १८१६

---

आपल्या देशाच्या लोक संख्येच्या मानानें दर हजारास शेतीवर निर्वाह करणारे ५९७ लोक आहेत. सरकारी नोकरी, लष्करी नोकरी, आणि परराष्ट्रांची नोकरी करणारे मिळून सुमारे २१ लोक आहेत. गवंडी व मजूर ८८ आहेत. आचारी, पाणक्ये माळी कसाई, वगैरे लोक ५० आहेत. खानगी नोकर ३९. बनचराईवाले १९. फेरीवाले ३२. इमारत काम करणारे ५ भाडेकरी ५-किराणा विके ४; साळी, शिंपी ४३ धातूंचे काम करणार १३. कासार, सुतार, कुंभार वगैरे २५. चांभार आणि ढोर १२. व्यापारी ३० धंदा करणारे वैद्य, वकील, चितारी वगैरे २०. गारोडी, नाटकवाले वगैरे ५. कांहींच काम न करणारे ३२. व बाकीचे चोर उचले वगैरे.

या स्थितीवरून पहातां सर्वांचा धंदा शेती किंवा मजुरी. या शिवाय दुसरा कोणताही धंदा लोक करीतच नाहींत असें ह्मटलें तरी चालेल. एकाच धंद्यावर जो देश अवलंबून राहील त्यास स्वास्थ्य कधींही रहावयाचें नाहीं असें आरिस्टाटलचें ह्मणणें आहे. जरा पर्जन्याची उणीव पडली किंवा इतर कोणत्याही ठिकाणीं युद्धादि कारणांनीं अन्नाची टंचाई पडली कीं महर्गता लोकांच्या मागणी मुळें वाढणार आणि लोकांस पुरेसें अन्न मिळण्याची देखील पंचाईत पडणार. आपणास आपल्या नैयंदिन आहार वृत्ताची इतकी अडचण पडू लागली आहे कीं आपण हल्लीं दुष्काळरूप स्थितींत दिवस कंठीत आहों. आपल्या खर्चांत काटकसर ह्मणजे उपासमार या शिवाय आपणास आपल्या बचावाचें दुसरें कांहींच साधन राहिलेलें नाहीं इतर मजुरांची आणि शेतावर निर्वाह करण्याऱ्याची स्थिति सारखीच आहे. कारण देशांत सुबत्ता असेल तर मजुरांची भरती आणि तरच गवंड्यादि मजुरांना तेजी. या प्रमाणानें शेकडा ९० माणसें निवळ शेतकीवर अवलंबून आहेत असें ह्मटलें तरी चालेल. आतां कोणताही देश एकाच प्रकारच्या उद्योगावर अवलंबून आहे हें पहाणें आहे. आह्मी इतक्यांतच सांगितलें आहे कीं शेतकीचें उत्पन्न मनुष्याच्या कौशल्या पेक्षां बऱ्याच अमानुष सृष्टिनियमांवर अवलंबून आहे. ज्या प्रकारचें खत शेतीस लागतें त्या प्रकारच्या खताच्या अभावामुळें जमिनीची सुपिकता कमी होत चालली आहे. जमिनीच्या सुपिकतेला "नैट्रोजन" नामक वायूची फारच जरूरी आहे. आपल्या इकडील बऱ्याच जमिनींतून दोन दोन पिकें काढून घेण्याचा प्रघात आहे त्यामुळें प्रतिवर्षी या अत्यावश्य वायूचा जितका खप होऊन तो जितका जमिनींतून निघून जात आहे त्या पेक्षांही अधिक जाऊं लागला आहे. या वायूस व त्या बरोबरच भूमिगत जीं अधिक उष्ण पीक देण्याची शक्ति असते तिला आपण कस असें ह्मणूं. जमिनीच्या कसाचा उत्तरोत्तर ऱ्हास होत चालला आहे. त्यांत परराष्ट्रांशीं चढाओढ करावी लागत असून आपणास आपल्या उत्पन्नापैकीं सरकारास अगर परराष्ट्रास भाड्याच्या रूपानें, व्याजाच्या रूपानें, आपल्यावर योग्य अंमल करण्या बद्दलच्या वेतनाच्या रूपानें द्यावें लागतें ह्मणजे जमिनींतून आपण तिच्या सामर्थ्या बाहेर काढून घेत आहों. शिवाय आपल्या राजकर्त्यांनीं पाश्चिमात्य अर्थशास्त्राचे नियम आपल्या जमिनीस व जमिनीच्या उत्पन्ना बाबीस लावले असल्यामुळें आपली स्थिती अधिकाधिकच शोचनीय होत चालली आहे. तसेंच कांहीं ठिकाणी लागवडी करण्यास प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष बंधनेंही आल्यावर लादलेलीं आहेतच. उसाची साखर होते. खरें आहे. परंतु उसाची साखर करितांना वाया जाणाऱ्या उसाची काय व्यवस्था करावी. साखरेची किंवा येथील उसाच्या खर्चाच्या मानानें उसापासून निघणाऱ्या द्रव्यास उत्पन्न करण्याची सरकारीं मदत मिळाल्या शिवाय परराष्ट्रांच्या चढाओढीमुळे आह्मांस परवडत नाहीं. या प्रमाणें कांहीं भूगत उत्पन्नाच्या बाबी आह्मास प्रतिबद्ध आहेत. जें आपणाजवळ साहित्य आहे त्यांतच आपणाला निर्वाह केला पाहिजे. याच कारणा मुळें गरीब बापुडे शेतकरी सावकाराचा दपटशा सोसून, कर्ज काढून, व जबर व्याजें भरून शेतकीच करीत रहातात. दुसरे धंदे करण्यास अधिक शहाणपण आणि तारतम्य लागतें. शेतीच्या धंद्यास एक व दोन बैल आणि त्याचा वेनावताचा उपयोग एवढीच होतात परंतु एवढ्या सामुग्रीनें पोटभर अन्न किंवा अंगभर कपडा मिळेल तर ती आशा व्यर्थ होय! मानसिक सौख्य अगर विश्रांती मिळती तर सावकाराच्या आणि सरकाराच्या देण्याची विवंचना. ही स्थिती शेतकीवर पोट भरणाऱ्यांची झाली. दुसरा धंदा करावा तर दुसरीं साधनें नाहींत. फार तर काय पण कोणी समाधानाचे शब्द देखील बोलणार नाहीं. भटक्यास तो स्वर्गी आणि मतकरी. देशांत निरनिराळे हुन्नर चालले असतां मनुष्यांत बुद्धिचांचल्य, कार्यदक्षता, पृथक्स्थिति सहनशीलता, इत्यादि गुणांचा आपोआप प्रादुर्भाव उत्पन्न होतो. कोणाजवळ एखादा धंदा राहील तर त्याच्या तावडींत न सांपडण्यासाठीं तो जितका सावध राहील तितके त्याचे सर्वच शेजारी सचेष्टोचे आणि सभ्य गृहस्थ असतील तर तो रहाणार नाहीं. धंदे करणाऱ्या कारागिरांत बुद्धितीक्ष्ण आणि तारतम्य नसेल तो ठार आणि सर्व बुडाला च असें मानण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. त्याला व्यवहारदक्षता आलीच पाहिजे. अशांसी व्यवहार ठेवणाऱ्यांतही थोडे फार याचे गुण आपोआप आलेच पाहिजेत. या प्रमाणें ज्या देशामध्यें उद्योगबाहुल्य असेल त्या देशामध्यें शहाणपणही वास करीलच करील यांत संशय नाहीं. यावरून निवळ एकाच व्यासगांवर आणि विशेषें करून शेतकीवर आपली उपजीविका करून रहाणाऱ्या देशाची स्थिती शोचनीयच रहाणार हें उघड आहे. शेतकीची देशास अवश्यकता आहे नाहीं असें कसें ह्मणतां येईल. उपजीविकेस जरूर लागणाऱ्या अत्यावश्य पदार्थांपैकीं अन्न आणि पाणी या मुख्य गोष्टी आहेत. नंतर कपडा वगैरे कमी महत्वाचे पदार्थांची गणना केली पाहिजे. परंतु या देशांत जें प्रमाण शेतकीवरच अवलंबून राहणारे सांपडेल असें दुसरी कडे कोठेंही नाहीं. याच कारणामुळें व शेतकीचा धंदा बराच स्वकष्टावर आणि बाह्य व अमानुष साधनांवर अवलंबून असल्यामुळें शेतकी करणाऱ्या लोकांना एकाद्या संस्थेंत मिसळण्या इतका वकूबही नसतो व ज्ञान ही नसतें ह्मणून निवळ शेतकीवरच किंवा एकाच धंद्यावर जर अवलंबून न राहण्याचीं एकाद्या देशांत साधनें असतील तर त्यांचा फायदा त्या देशानें न घेतल्यास त्याच्या इतका हतभाग्य कोणता देश असूं शकेल बरें!

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH,

4, 1895

---

It has often been a question whether it is the masses that lead their leaders, or the leaders lead the masses. The popular conception of history favours the latter opinion. All history has been supposed to be a narrative of the achievements of central figures that permanently occupy the attention of the majority of men. Inspite of the growing habit of this century to look at great epochs from a philosophic point of view the hereditary love of hero-worship has not yet been absent from the speculations of mankind. It is only recently that a more rational and correct estimate of the bearings of history has been taken. Historians now look upon a nation and its development as a whole. Any apparent manifestation of the working of the nation's universal feeling, sense and aspiration in the form of a prominent figure is but an insignificant part of the aggregate. A leader is but a resultant of complex forces and passions, that sway a people either for good or evil. To ascribe any epoch, any crisis or any triumph to a particular individual in a nation is a common and unscientific view of the matter. Man is but a wave of the ocean of humanity. The ebb and flow is but the result of the universal commotion and agitation of the whole world of water. To praise or blame any leader of men for success or failure is to praise or blame the cyphers on account of the total In people's events there is a will, there is a sense, there is an aspiration which is the will, sense, aspiration, and yet not that of anyparticular individual. That general working of the national will regulates men's acts. Events dictate, men lead. To ascribe the building up of the Romon Empire to Scipios or Cæsar is to ignore the characterestic expansion of the Roman mind. To ascribe the reign of terror to Robespierre is to be blind to the commonest fact in nature, a dangerous remedy can alone cope with the malady of centuries. If such is the conception of History and such the philosophical view of it, it is the needless to state that leaders of masses are but the articulate and active expression of what the masses are feeling, of what is agitating the universal mind. Great leaders are the results of antecedent cause, their actions, doings and achievements are but the necessary corrolories of antecedent conditions.

---

The indebtedness of the agricultural masses is alarming and, in conjunction with the present enhancements in the rental, it threatens to reach an extent that will show people to totter on the brink of poverty, starvation and utter helplessness. Unless the Government comes forth to lend a signal and resourceful help the prospect is nothing but dismal. In the Maharastra, the problem has attracted a good deal of public attculian and we would request the local Government to adopt the same specific remedies as are briefly explained in the eloquent remarks of the Hon'ble Mr. Mehta on the newly amended Dekkan Agriculturist's Relief Act. They run as frelow:—

"It is also more cheap and perhaps more speedy. It enlists the sympathies of both classes and largely obviates bitterness of feeling. It has strengthened the hands of the weak and given them confidence, while at the same time it has not destroyed credit, where credit was not a fiction. It may even be said that it has not so far checked *bona fide* loans, and only discouraged speculative and usurious business. It has created responsible feeling about the raiyat's claim to his land. These are no small advantages, and some of the amendments now proposed will go to improve and strengthen the Act. But such legislation does not

go to the root of the matter of the raiyat's indebtedness. The saukar is not the head and front of the offence. The Commission of 1891 has pointed out that the rigidity and inelasticy of the revenue-system have much to answer for. Though it is open to revenue-officers to grant remissions and suspensions, and though the Government of Lord Ripon advised a policy of well-judged moderation in this respect in practice, the rigidity and inelasticity are not slackened. As the executive will not thus move, is it not necessary that there should be some provisions in the Act by which, just as there are special Courts to adjudicate equitably between the raiyat and the usurious saukar, there should be special Courts to do the same between the raiyat and the rigid State landlord? It would be enough that the revenue officers should themselves form the Courts, but in these courts they must decide questions of remission and suspension, subject to equitable rules similar to those enacted for relieving the raiyat against the pressure of the saukar. If it is not the intention to shelve more comprehensive legislation as it was at one time hoped would be undertaken, I trust that these questions of larger policy going really to the root of the evil may be efficiently dealt with."

In its brief summary of the Progress of Education in India for 1893—94, the Government of India observes—

"It is satisfactory also to observe that the increase noticed last year in the number of pupils at Secondary and Primary Schools has been maintained, the former having risen from 488,261 at the end of March 1893 to 507,658 at the end of March 1894, and the latter from 2,890.824 to 2,947,530. There were 4,370 pupils attending Training Schools for Masters on the 31st. March 1894, against 4,327 on the corresponding date in 1893; but the number attending Training Schools for Mistresses, which had risen from 793 at the close of 1891 92 to 1,092 at the close of 1892 93, again fell away to 909 at the close of 1893-94. There was, however, a steady increase in the number attending other special schools, from 16,586 at the end of 1892 93 to 18,363 at the end of 1893-94. Of the total number 4,066,235 of pupils (including those in private institutions) receiving instruction, 404,591 were studying English, as compared with 388,650 in the previous year."

A Reuter's telegram of the 20th instant states that in the House of Commons a Resolution moved by Mr. Howard Vincent to restrict the importation into England of products of German prison labour was carried without a division, the Government yielding after first opposing the question. We ask, is this Free Trade?

The tendency of English politics seems to us to lie in the direction of modyfying the principles of Free Trade so far as it applies to Great Britain by dictates of self-interest, while with regard to poor India no such qualifications are to be permitted. Great Britain will do well to set about to reconsider her commercial and financial policy in India in the light of her own experiences in that line. We conclude, as we began, with the question if the Resolution passed without a division the other night by the House of Commons is consistent with the much-vaunted Free Trade policy of Great Britain? H

## वऱ्हाड

या महिन्याच्या सेशनांत पुष्कळ खटले होते त्यांत एक शेगांवचा खटला मारामारीचा होता परंतु त्याला खुनाच्या प्रयत्नाचें स्वरूप दिलें होतें. शेगांवचे रावसाहेब मारुती पाटील यांच्या व्यूंग शेगांवच्या देशमुख आदिकरून पांचजणांनीं मारण्याचा प्रयत्न केला असा आरोप होता. आरोपी तर्फे रा. रा. खापर्डे व देसाई असे दोघे वकील होते. पुरावा अगदीं खोटा, अविश्वसनीय, व विसंगत ठरला आणि सर्व आरोपी दोषमुक्त ठरले. शेगांवास एका प्रकारची बंडाळी व धामधूम चालूं असते असें या खटल्यावरून दिसलें. पोलिसच्या करवाईला जेव्हां वकिलांनीं भुईनळे व सुरुंग लावले तेव्हां तिचे तुकडे तुकडे उडाले. रा. मारुतीराव यांचा पक्ष निर्बळ, अस्ताव्यस्त व भयाभीत झाला आणि क्याप्टन हार्सब्रव यांनीं हा खटला सेशन कमिट केला होता चूक झाली असें सर्वांस वाटलें.

वरील खटल्यानंतर लाखनवाड्याचा खुनाचा खटला निघाला. तेथील कारभारी पटलाचा दिवसा ढवळ्या खुन केल्याचा आरोप होता. पुरावा अगदीं बेभरंवशाचा ठाला आणि चारही आरोपी दोषमुक्त झाले. ज्या पुराव्यावरून आरोपी खुले करण्यांत आले तोच समूळ पुरावा मे हेअर साहेबांसमोर असतांना देखील त्यांनीं खुनाचा आरोप ठेऊन सेशन कमिट केला होता.

या दोन्ही खटल्याचें तात्पर्य कांहीं निराळेंच आहे आणि तें असें कीं:—कारभारी पाटील आपल्या दांडग्या अधिकाराच्या व पैशाच्या बळावर गांवांत पुंडाई मानवितात, गांवांतल्या लोकांमध्यें या त्रासानें दुफळ्या व दूही मानतात आणि गोष्ट विकोपास पोंचली ह्मणजे मलकापुराकडील घिरणीच्या गणू पाटला प्रमाणें मृत्युमुखीं पडावें लागतें. शहाणपणाचा किल्ला ह्मटला ह्मणजे आपण भला तर सर्व जग भलें!

नबाब सुलतान उल मुल्क हे सरकारी कामधाम शिकून येत्या बुधवारीं आपल्या घरीं हैदराबादेस जाण्यासाठीं रवाना होत आहेत. या नबाब बहादुरांनीं आपल्या थोर कुळाच्या नांवा प्रमाणें सर्वतोमुखीं चांगलें ह्मणवून घेतलें हें त्यांच्या वयोमानाला अत्यंत भूषणास्पद होय

मे. हेअर साहेब डेपुटी कमिशनर यांची स्वारी या आठवड्यास सदर स्टेशनला दौऱ्यांतून परत येत आहे.

रा. रा. पंडित सरन नारायण असि० कमिशनर यांची बदली बडनेरा कोर्टावर होणार असल्याचें कळतें.

### नोटीस

रा. रा. रावजी वलद घनाजी पुंड रहाणार शिवपूर ता० अकोट यांस नोटीस देणार भगवानजी वा येकोजी कोळंबकार रहाणार उमरी इतवारपूर ता० दर्यापूर नोटीशीनें असे कळवितो की तुह्मी आह्मा पासून रुपये १०० पांचशें घेऊन शिवपूर येथील तुमचे खात्याची शेती आह्मास तारण गहाण तुह्मी लिहून दिली सदरहू रुपयास व्याज दरमहा दर शेकडा रुपया १॥ प्रमाणें करार करून तुह्मी रुपये घेतले न मध्यंतरीं व्याजाबद्दल रुपये ९० नगद आणून दिले आजपावेतों तुह्मी सदरहू रुपये व त्याचे व्याजाचा कांहीं निकाल केला नाहीं. याजकरितां तुह्मास असें कळवितों कीं नोटीस पावल्यापासून आठ ८ दिवसांत सदरील रुपये ५०० व आजपावेतों झालेलें व्याज व ह्या नोटीशीचा खर्च असें देऊन निकाल करावा असें झालें नाहीं तर रीतीप्रमाणें कज्या चालवून सर्व प्रकारचा खर्च व नुकसान असें भरून घेतलें जाईल ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ३ माहे मार्च सन १८९५ इसवी.

सही
भगवानजी वलद एकोजी कोळमकार
राहणार उमरी इतवारपूर
दस्तुर खुद्द.

### नोटीस

फकीरा वलद शेकोजी घोडे राहाणार बोरडी तालुके अकोट याम नोटीस देणार सारजी मर्द भगवानजी कोळंबकार रहाणार उमरी इतवारपूर या नोटीशीनें असें कळवितें कीं माझा भाऊ किसन (मयत) याच्या खातेचें शेत बोरडी येथील आहे. ते तुह्मी वाहात आहा- सदर्हू शेत तुमची मुलगी नामें भागी हीनें जन्मभर दुसरा नवरा न करतां आणि मरे पर्यंत सदर्हू शेत अन्नवस्त्राबद्दल खावें असें झालें नाहीं तर सदर्हू शेत तुह्मी विन तक्रार आमचे आमच्या ताब्यांत द्यावें. आह्मी असें ऐकतों कीं भागी सदर्हू शेत विकून नंतर दुसरा घरठाव करणार आहे. याकरितां तुह्मास हे अगोदर कळविलें आहे. जर दुसरा घरठाव करून शेत विकलें तर या नोटीशीच्या खर्चासह व इतर योग्य खर्च जे जे लागतील ते व शेत वगैरे सर्व आमचे अह्मांस मिळण्या बद्दल योग्य ते काम चालवून सर्व प्रकारची नुकसानी भरून घेतली जाईल ह्मणून दिली नोटीस सही. ता० ३ माहे मार्च सन १८९५ इ०

सही
सहीची निशाणी सारजी मर्द भगवानजी
कोळंबकार इच्या हातची
बांगडी असे.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस सारजी मर्द भगवानजी कोळमकार राहणार उमरी इतवारपूर तालुके दर्यापूर या जाहिरातीनें असें प्रसिद्ध करितें कीं माझा भाऊ नामें किसन [मयत] याच्या खात्याचें शेत मौजे बोरडी तालुके अकोट येथील शेत आहे. माझी बहीण नामें बापजी व मी या शिवाय किसन यास वारस कोणी नाहीं. आह्मी उभयतां त्याच्या स्थावर जंगम इस्टेटीचे वारस आहों. व सदर्हू किसन याचें खातेचें शेत फकीऱ्या वलद घोडे हा वाहत आहे. व फकिऱ्याची मुलगी नामें भागी ही माझी लहान भावजय आहे. व तिच्या जिवनापर्यंत तिनें दुसरा नवरा न करितां राहावे. जर दुसरा नवरा करणार नाहीं तर सदर्हू शेत तिच्या जन्मभर तिनें अन्नवस्त्रा करितां खावें. सदर्हू शेत जर कोणी आमच्या संमती शिवाय गहाण, खरेदी अथवा बक्षिस वगैरे घेईल तर त्याजबद्दलचे सर्व प्रकारानें जबाबदार ज्याचा तो आहे. शेत किंवा आह्मी नाहीं. ह्मणून दिली जाहिरात सही तारीख ३ माहे मार्च सन १८९५ इसवी.

(सही)
सहीची निशाणी सारजी मर्द भगवानजी कोळंबकार हिच्या हातची बांगडी असे.

### नोटीस

रा. रा. चुनीलाल पीरदान मारवाडी राहणार वडाळी परगणे पनज तालुके अकोट यास नोटीस देणारे किसन वलद रोडाजी तेली, माधोजी वलद यादोजी माळी व रामजी व० हंबीरजी माळी राहणार वडाळी परगणे पनज तालुके अकोट या सर्वांकडून ह्या नोटीशीनें असें कळविलें जातें कीं तुह्मी व लक्ष्मणजी तोडरे राहणार वडाळी, व आह्मी त्रिवर्गांनीं मिळून रंभापूर येथील शेत एक वर्षाकरितां रुपये ४०० चारशेंस तुह्मी व आह्मी सर्वांनीं मिळून केलें. त्या शेतांतील आजपावेतों कापूस एकंदर खंडी १४ चवदा तुह्मास मोजून दिला त्याचे रुपये बाजार भाव दर खंडीस ४० प्रमाणें झाले ते पांचशें साठ [५६०] त्यांत आह्मी नोटीस देणारे तिघेजण यांच्या कडील ठरावाचे रुपये तुह्मास मिळून जास्ती कापूस २ खंडी तिघांचा तुमचेकडे राहिला तो खंडी दोन याचे दाम रुपये (८०) ऐंशी तुह्माकडे आमचे तिघांचे जास्त जमा आहेत ते ही नोटीस पावल्यापासून दिवस आठचे ८ आंत रुपये देऊन पावती घ्यावी असें झालें नाहीं तर रुपयाबद्दल व ह्या नोटीशीच्या खर्चाबद्दल व अखेर निकाल होईपर्यंत जो खर्च वगैरे होईल तो सर्व आपले पासून भरून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस सही तारीख १ माहे मार्च सन १८९५ इसवी.

सह्या
किसन व रोडाजी तेली राहणार वडाळी
प्रगणे पनज द. खुद्द.
माधोजी व० यादोजी माळी गांरडे राहणार वडाळी परगणे पनज नि. खु.
रावजी व हंबीरजी माळी राहणार मौजे
वडाळी प्रगणे पनज ता. अकोट
नि. खुद्द दस्तुर किसन वलद
रोडाजी तेली.

### नोटीस

नोटीस बेशमी— गयाबाई जवजे निळकंटराव कुळकरणी मौजे अडगांव तालुके दर्यापूर जिल्हे इलिचपूर हल्लीं, राहणार अकोट तालुका मजकूर.

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं निळकंटराव हा आमचा साक्षांत पुतण्या असून त्याजला मरण्याला अंदाजा दीड वर्ष झालें व त्याचे पश्चात तुह्मी दत्तक घेणार आहां असें आह्मी ऐकतो करितां तुह्मांस नोटीस देण्यांत येते कीं आमचे संमती वांचुन तुह्मी दत्तक घेऊं नये. घेतल्यास रद्द समजलें जाईल. कळावें. तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८९५ इ०

(सही)
देवराव कृष्ण कुळकरणी द० खु०
त्रिंबक गोविंद पटवारी द० खु०
कसबे अडगांव तर्फे व ता० दर्यापूर

## वर्तमानसार.

म्यांचेस्टरचा व्यापार बहुतक बसत चालल्यामुळें, व्यापारी लोक नवी कल्पना शोधण्यांत गुंतले आहेत. हुंडीच्या भावामुळें, व्यापारास खोट येते ह्मणून, सोनें व रुप्याचें नाणें सुरू करण्याच्या खटपटीसही लागले आहेत.

पोलीस कायद्यांत जो नवा फेरफार होण्याचें घाटत आहे, त्यामुळें वाईट परिणाम होतील असें एका मोठ्या इंग्लिश अमलदारानें आपलें मत प्रसिद्ध केलें आहे.

हिंदुस्थानांतील कापूस हल्लीं परदेशांत कमी जाऊं लागला असून, त्याचें पुढचें लक्षणही बरें दिसत नाहीं.

कराचीस मोठ्या समारंभानें गायत्रीपुरश्चरणाचा विधी होणार आहे.

मि. डाकोस्ता नांवाचे एक युरोपियन गृहस्थ असें ह्मणतात कीं, अफगाणसरहद्दीवर खर्च करणें हे पार्लमेंटच्या एका कायद्याविरुद्ध आहे.

केटा येथें डेप्युटी कमिशनरासमोर एक सरदार साक्षीस आला असतां, कमिशनरसाहेबांनीं दाढी धरून मुखश्रींत लगावली, हा कोण जुलूम?

मस्कतच्या सुलतानाविरुद्ध तेथील प्रजेनें बंडाळी केली आहे. इंग्रज सरकारची डाळ अशा वेळीं बरीच शिजेल असें ह्मणतात.

सोन्यारुप्याचें नाणें इंग्लंडांत सुरूं करण्याबद्दल चाललेल्या प्रयत्नास यश येईल असें ह्मणतात.

इंग्लंड व त्याच्या ताब्यांतील संस्थानांत छाकटेपणा झपाट्यानें वाढत चालला असल्याबद्दल चहूंकडे हाकाहाक उडाली आहे. लाज पाहिजे.

लढाईच्या खर्चासाठीं जपाननें दहा कोटीच्या प्रॉमिसरी नोटा काढण्याची तजवीज केली आहे.

न्याशनल रिव्ह्यूमध्यें अगबेला केनर्ली नांवाच्या, वैद्यकीच्या धंद्यांत प्रसिद्ध असलेल्या एका बाईनें आपला अनुभव प्रसिद्ध केला आहे. त्या ह्मणतात कीं, मिसेस ग्राहाम व मिसेस एडन या दोघींच्या अनुभवावरून माझी खात्री झाली आहे कीं, चांगल्या शिकलेल्या, तरतरीत बुद्धीच्या व आपल्या नवऱ्याच्या बरोबरीनें मानसिक श्रम करणाऱ्या स्त्रीस ती जरी फटाकड्यासारखी खणखणित असली तरी पोर चांगलें सतेज व चपल होत नाहीं. सुकुमार, शांत व पाणीदार नव्हे, अशा स्त्रीला जितकें चणचणीत, गुटगुटीत व चपल पोर होतें, तसें मानसिक श्रम करणाऱ्या फाटाकड्या स्त्रीला होत नाहीं.

चिनी लोक औषधें देतात तीं — झऱ्याच्या पाण्यांतून किंवा स्त्रियांच्या दुधांतून देतात. ते लोक कोणत्याही जनावराचें दूध खात नाहींत. मोठमोठ्या पुष्टस्तना स्त्रिया दूध काढून विकण्यासाठीं दुकानावर बसलेल्या असतात आमच्या. देशांतील एक प्रवासी तेथें दुधाची चौकशी करीत गेला व भांडें पुढें ठेवलें, तेव्हां एका स्त्रीनें आपल्या स्तनांतील दूध पिळून त्याचे भांडें भरून दिलें. खरें असल्यास आश्चर्य ह्मणावयाचें.

स० वि०

गोंडळचे प्रमुख हिंदु व प्रमुख मुसलमान यांनीं आपसांत तन्टे न होण्याकरतां, दोघांनींही धर्मसंबंधीं वाद्यें वाजविण्याच्या बाबतींत उभयतांस सोईवार अशा कांहीं अटी ठरवून त्या प्रमाणें आपसांत एक करार तयार करून तो संस्थानचे मालक ठाकुर साहेब यांच्यापुढें त्यांच्या पसंतीकरता ठेवला आहे. ठिकठिकाणच्या लोकांनीं आपसांत अशीच व्यवस्था करावी हें चांगलें.

बार्शी स्टेशन व बार्शी शहर यांच्या दरम्यान निझामच्या हद्दींतल्या दरोडखोरांनीं नुकतेच दोन तांगे रात्रीः १० वाजतां लुटले व उतारूंची सर्व चीज वस्त नेली. कांहीं मुद्दा नाहीं.

हिंदुस्थानांतल्या इंग्रज नोकरांस १८९३।९४ सालीं हूंडणावळीबद्दल एकंदर ६२,४४ ११० रुपये देण्यांत आले व १८९४।९५ सालीं १,१२,२१,००० रुपये देण्यांत आले. ज्यांस हुंडणावळ द्यावयाची त्यांच्या पगाराची एकंदर रकम सुमारें ८ कोट रुपये आहे असें मि. मेथा यांच्या प्रश्नास हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौसलांत ता. २१ रोजीं जो जबाब मिळाला त्यावरून होतें.

असिस्टंट सर्जन खानबहादूर अमीरशहा यांणीं काबूलच्या अमिराची नोकरी पतकरली. अमीर हा अशा एका माणसास आपल्या पदरीं घेण्यास इतका उच्छुक झाला कीं, वरील असि० सर्जनानें सांगितलेल्या सर्व अटी अमिरानें कबूल केल्या. अमिरास औषधोपचार करण्याचें या असि. सर्जनाचें काम आहेच. पण त्या शिवाय त्याच्या देखरेखीखालीं तेथें एक मेडिकल कालेज सुरू करण्याचाही अमिराचा इरादा आहे.

पेकीन नावाच्या चीनच्या राजधानीवर चाल करून जाण्याचा जपानचा निश्चय आहे व पेकीन शहरांत आपला झेंडा लावल्या वांचून तहाचें बोलणें करावयाचें नाहीं असें ही जपानचें ह्मणणें आहे. इकडे चीनानें पेकीन शहराच्या संरक्षणाकरितां व जपानचा हल्ला आल्यास त्याचा पाडाव करण्याकरतां आपली ९,००,००० फौज त्या शहरा भोवती सज्ज करून ठेवली आहे असेंही सांगतात. तेथें जे परकीयलोक आहेत त्यांणीं आतांच तेथून काढशह घ्यावा हें चांगलें कारण या फौजेच्या भीतीनें रोग सुरू होण्याची भीती आहे असेंहि कित्येकांचें ह्मणणें आहे.

मस्कद येथील प्रजा तेथील राजाच्या विरुद्ध झाली असून तें शहर हल्लीं त्या बंडखोर लोकांच्या स्वाधीन आहे व त्या बंडखोराचे मुख्य शेख अबदुला व हमदला जाफी हे आहेत. राजा व त्याचा भाऊ हे दोघे जलाली व गराजी हे दोन किल्ले आपल्या ताब्यांत ठेवून बसले आहेत. तेथील इंग्रज लोकांच्या रक्षणार्थ एक इंग्रजी लढाऊ गलबत जात आहे.

इंग्लंड व रशिया यांचें सख्य झालें कीं, दोघांसही आपल्या लश्करी खात्याच्या खर्चांत पुष्कळ काटकसर करतां येईल असें एका रशियनपत्राचें ह्मणणें आहे.

अमेरिकन सरकार लंडन येथें कर्ज काढीत आहे.

नीचंग येथें जी चिनी फौज आहे तिच्या मदती करता नवी २०,००० फौज आली.

गव्हांचे माप बुशलवर आहे. १८९४ सालीं दरएकरास सरासरीं; १७ बुशलप्रमाणें गहूं पिकले व एकंदर पीक २,००,००,००० बुशल झालें. या एकंदर उत्पन्नापैकीं सुमारें ६०,००० बुशल गहूं बियाण्या करितां व खाण्याकरतां ह्मणून शेतकऱ्यांच्या हातांत आहेत. ओट धान्य १,०२०,००,००० बुशल पिकले व बारली ३०,००,००० बुशल पिकलें. ३१,००० एकर जमिनीत ३,७०,००० बुशल पिकलें व एक बुशलची किंमत १ शिलींग धरली तर हें पीक फायदेशीर ठरतें. बटाटे एका एकरांत १५३ बुशल पिकलें व बटाट्यांचें एकंदर पीक २०,३६००० बुशल झालें. ८,००० एकर रूटच्या पिकाकडे होते व त्याचें उत्पन्न २०,००,००० बुशल झालें. हा मानिटोबा प्रांतांतल्या पिकाचा अदमास आहे. या शिवाय गुरें व बकरीं ही त्या देशांतून बाहेर जात असून ३,००,००,००० रुपयांचें तर लोणीच त्या देशांतून जातें. हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांनीं व हिंदुस्थानचें हितकरूं इच्छिणाऱ्यांनीं हें आंकडे ध्यानांत ठेवण्यासारखें आहेत,

अ० द०

दरवडा— पनाळगडाखालीं नेवपूर येथें गेल्या आठवड्यांत पाटलाचे घरावर दरवडा पडून ३० हजारांचा विषय गेला. ह्या दरवड्यांत त्या पेठ्याचा सालम हवालदार यांचे अंग असल्याचें उमगल्यावरून त्यालाही पकडला आहे असें समजतें.

एका श्रीमान गृहस्थानें मृत्युपत्र करून आपली सर्व जिनगी चार मित्रांच्या स्वाधीन करून तिची व्यवस्था त्यांनीं करावी असें ठरविलें व मृत्युपत्रांत लिहून ठेविलें कीं, "त्याना पसंत पडेल तें त्यांनीं माझ्या वारसाला द्यावें" पुढें तो श्रीमान गृहस्थ मेल्यावर त्याच्या वारसानें जिनगीसाठीं फिर्याद केली. न्यायाधिशानें मृत्युपत्र पाहून त्या चौघांना विचारलें, "मृत्युपत्राप्रमाणें तुह्मी कसें काय करणार?" ते ह्मणाले "सर्व जिनगीचे दहा हिसे करून नऊ हिसे आह्मी घेणार व एक हिसा या वारसाला देणार. न्यायाधिश ह्मणाला "बरें तर, एक हिसा तुह्मी ठेवा व नऊ हिसे वारसाला द्या. कारण, जें तुह्मांला पसंत असेल तें वारसाला द्यावें असें यांत लिहिलें आहे!!

बल्लारी जिल्ह्यांत हल्लीं एक बनाऊ मृत्युपत्र केल्याचा जंगी खटला सर्वतोमुखी होऊन गेला आहे. ह्या खटल्यांत मृत्युपत्राचा संशय आल्यावरून मयताच्या बायकाची साक्ष घेण्या करितां कोर्टानें तिचे घरीं कमिशन पाठविलें होतें, परंतु लबाड लोकांनीं दुसरीच बाई पडद्याचे आंत बसवून आपला मतलब साधून घेतला. पुढें खऱ्या बाईस जेव्हां हा प्रकार कळला, तेव्हां तिणें वकील करून त्यांचें मार्फत आतां खटला चालविला आहे! लबाड लोकांची हद्द आहे! स. शो.

साधें हवा मापक यत्र— जर्मनी आणि स्वाल्हर्लंडमध्यें एका खुजांत पाणी घालून त्यांत एक बेडूक आणि लहानशी शिडी ठेवितात, तो बेडूक पाण्यांतून निघून शिडीवर चढला ह्मणजे मोठें वावटळ होऊन अतिशय पाऊस पडणार असें तिकडील लोक समजतात. कारण पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून ती गोष्ट सिद्ध झाल्या सारखीच आहे.

प्रोसेस— दिवाणी कोर्टाकडील साक्षी समन्सें वगैरे बनावण्यास लागणारी प्रोसेस फी आज पर्यंत दाव्याच्या रकमेवर स्केलोन आकारलेल तितकी घेण्यांत येत असे. परंतु ती तशी न घेतां प्रोसेसचा ठरीव दर काण्याचा विचार हल्लीं चालल्याचें समजतें. ह्मणजे ५ रुपयांचा दावा असला तरी ८ आणे प्रोसेस, आणि मोठा दावा असला तरी आठ आणेच! मोठ्या रकमेच्या दाव्यांतील पक्षकारांस हें कांहींसें फायदेशीर होईल, परंतु लहान लहान दावे करणारांचा यांत पुरा रेच निघणार आहे. शु० सू०


## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण—तो मजेदार—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्यापासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरतरट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतीनीस व तिचे रोगावर खाण्यास गूण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्यालुपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले नमोनी.

त्वरा करा! पौष्टास खा!! गेला हिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.

शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर

दवाखाना अकोला वऱ्हाड.

## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेकेव रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे सुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर " ७ " १८
किरकोळ अंकास ................ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

Six monthly ......... 3 " 8 a
Single copy.............................. 4 a

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 11 MARCH 1895 NO. 10

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ११ माहे मार्च सन १८९५ इ० अंक १०

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत ना. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर वि-क्रया, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण अल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें कॅपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गनकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरे झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असुन आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, स्लाटर हाऊसचा, कमेटीचे हद्दीतील कचरा वाहून नेण्याचा, व स्टेशन धर्मशाळेचा कर वसूल करण्याचे हक्काचा लिलांव सन १८९५।९६ सालाचा तारीख १८ माहे मार्च सन १८९५ इसवी रोजीं सकाळीं ७॥ टौनहॉलांत हरास होणार आहे ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस हजर होण्याचे करावें. कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८९५ इसवी.

Md. Husain
Secretary
A. M. C.

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त, हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत [ उच्चारासह ] जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा शाखाने पसंत केलेले किंमत. ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.

## नोटीस

रा. रा. धनु सगण्या माळी रहाणार वाळकी तालुके अकोलें यांस खालीं सही करणार यांज कडून कळविण्यांत येते कीं, ऋणको पिराजी पाटील रहाणार सेकापूर यांचें शेत माझा पुतण्या मयत सुकदेव यानें कर्जफेडीत लाऊन घतलेलें तुमच्या कडेस निम्या बटाईनें दिलें होतें त्याचा सर्व वायदा नोटीस देणारीनें भरला असून तुह्मी बटाईच्या मालाची व निम्या वायद्याची कांहीं तजवीज केली नाहीं तर या लेखान्वयें कळविण्यांत येतें कीं तुमच्या गैर गोष्टी मुळें आमचें जें नुकसान होईल तें या नोटिशीच्या खर्चा सकट शेकडा दोहोत्रा व्याजाच्या दरानें सव्याज भरून कोर्ट मार्फत घेतलें जाईल. कळावें तारीख ६ माहे मार्च सन १८९५ इसवी.

( सही )

केसरबाई जवजे रामनाथ केला.
चिरंजीव सुकदेव भगवानदास
यांच्या इस्टेटीची वारसदार. इच्या हातची
निशाणी खुद.

## प्राणिजीवन शास्त्र

प्राणि जीवन शास्त्राचे मुख्य भाग तीन आहेत पहिला भाग physiology आरोग्य जीवन शास्त्र P athology रोग निदान शास्त्र Histology जविजाल शास्त्र. परंतु या तिन्हीचाही समावेश एकाच विषया खालीं होतो. आणि शरीर आरोग्य स्थितींत असो अथवा रोग स्थितींत असो अथवा त्याच्या घटकावयवांचा विचार करावयाचा असो हे तीन्ही भाग biology जीवन शास्त्र या विषया खाली येतात.

सर्व प्राण्याच्या शरिरामध्यें एका प्रकारची उद्भुत द्रव्यरचना असते. ही रचना कठीण अथवा घनीकृत किंवा प्रवाही अथवा जलीभूत द्रव्याची बनलेली असत, आणि या दोन्ही द्रव्यांचा नेहमीं परस्परांतर अन्योन्य व्यापार चालूं असतो. [ २ ] प्रत्येक पदार्थ बीजरूप असून क्रमाक्रमानें त्यास पृथक् अवस्था प्राप्त होते ह्मणजे ज्या पदार्था पासून तो उत्पन्न झाला असतो त्या पदार्था पासून त्यास भिन्नत्वानें आणि स्वतंत्रतेनें राहतां येते. [ ३ ] अशा स्थितींत आल्यावर प्रत्येक प्राण्यास स्वीकरण आणि उत्सर्जन शक्ति येतात. [ ४ ] प्राण्यास भिन्नावस्था मधून योग्य प्रसंगीं आणि योग्य काळीं जातां येतें. ( ५ ) प्रत्येक प्राण्यास कांहीं अव्यवस्थित स्थिती प्राप्त होते परंतु तींतून त्यांस पार पडतां येते या स्थितीस अनामय अथवा रोगस्थिती ह्मणतात.

या प्रमाणें उद्भूत प्राण्याचे त्याच्या आकारा वरून त्याच्या अवयवाचे रचने वरून ज्या द्रव्या पासून त्याच्या अवयवांची घटन होते त्या वरून आणि त्यांच्या रसायनिक घटनें वरून प्राण्यांचे निरनिराळे भाग झाले आहेत.

प्रत्येक प्राण्याच्या अवयवांचे रचने मध्यें परिमाणु जाल, Molecular tissues तंतुजाल, fibrous आणि नलिकाजाल Connective or tube आणि सूक्ष्मरंध्र पूर्णजाल Celfar tissues असे चार प्रकारचे जाल ज्यांना टिस्युज असें ह्मणतात ते असतात. हे शिरा आणि स्नायु यांचें परिपोषण करितात. व त्या पासून आंतर्तेचें परिपोषण होतें.

नर्व्हस सिस्टिमचे गुण आणि तिची क्रिया.

यावरून इसकें सिद्ध होतें कीं आपल्या जीवनक्रमा मध्यें, आपल्या शिरांच्या रचनेचा एकसारखा स्वीकरणक्रम आणि उत्सर्जनक्रम चालूं असतो. त्याच प्रमाणे प्राण्यांचा मेंदु हा एका प्रकारच्या मुख्य विद्युत्स्तंभाचें काम करीत असतो आणि तो विद्युत् वेगानें प्रत्येक शिरेस कांहींना कांहीं काम करावयास लावीत असतो. त्या मुळें त्यांना विश्रांतीची अवश्यकता आहे आणि ह्या मस्तिश्क संबंधीं क्रियांचा निरोध किंवा त्यांची विश्रांती ह्मणजे निद्रा. या स्थितिची प्रत्येक प्राण्यास अतिशय जरूर आहे. ही स्थिति प्राप्त न होईल तर मनुष्य Coma syncopeasphysica या पैकीं कोणत्या तरी एका स्थितींत जाईल. या सर्व स्थितीचा थोडा फार झोपेशीं संबंध आहे. प्राण्याच्या कोणत्याही क्रियेमध्यें, कोणत्याही

तीमध्यें आणि कोणत्याही हालचालीमध्यें ाळक्षय हा झालाच पाहिजे. ह्मणून नवीन सत्व समृद्धि करितां त्याला विश्रांतीची अवश्यकता आहे. ह्मणून नवीन सत्व समृद्धि हो पर्यंत आपल्याला मस्तिश्क संबंधी शिाव्यापारांना विश्रांती दिली पाहिजे. ह्मणूनच प्रातःकालीं निजून उठल्यावर आपणांस आपण अधिक तर्तरीत आणि हुशार झालो आहोत असें आढळून येतें. स्नायूना नितकी अधिकाधिक शक्ति मिळेल तितकी शिरांना आणि मानसिक शक्तीला अधिक बळकटी येते. झोंपही प्राण्यास अत्यावश्यक आहे. त्याप्रमाणें ज्या दिवशीं शरिराला कमी जास्त प्रमाणानें अधिक उणी मेहनत पडली असेल आणि पोषकजालांचा अगर मस्तिष्कजालाचा फार किंवा थोडा क्षय झाला असेल त्यामानानें गाढतर अथवा गाढ, दीर्घ अथवा अचिर निद्रा येते. त्याच प्रमाणें निद्रेचें प्रमाण मनुष्याच्या प्रकृतीवरही अवलंबून असतें. कित्येकांची झोंप अत्यल्प असते. आणि कित्येक नेहमीं निद्रावश असतात. कित्येकांची निद्रा त्यांच्या संवयी वरून आणि प्रकृती वरून विलक्षण प्रकारची असते. कांहींना कशीही वस्तुस्थिति प्राप्त झाली असतां नियमित कालापासून नियमित कालापर्यंतच निद्रा येते आणि तो काळ टळल्यास दुसरे दिवशीं तो काळ येईपर्यंत झोंप येत नाहीं. साधारण मानानें प्रथमतः इंद्रिय वृत्ति आणि विचारशक्ति मंदमंद होत जातात. परंतु कल्पनाशक्ति आणि दुसऱ्या लघु व चंचल शक्ति बंद होण्यास अधिक काळ लागतो. कांहीं प्राणि एकाएकीं जागृत होतात; परंतु गाढ निद्रेंत आणि जागृत अवस्थेंत सर्व प्राण्याची प्रायः एक अवस्था असते. या स्थितीच्या वेळेस मनुष्याची झोंप फार सावध असते. आणि त्याला सहन उठवता येते. व यावर, प्रकृतीवर, संवयीवर, पूर्व श्रमांवर मनुष्यानें किती झोंप घ्यावी आणि त्याला किती झोंपेची अवश्यकता आहे हें अवलंबून असतें. बाल्यावस्थेंत, वृद्धावस्थेंत, आणि अत्यंत वृद्धावस्थेंत जीवन ह्मणजे बहुतेक निद्रायदच असते. तरुणपण, संबंधानें नियमित निर्बंध घरतां येणार नाहीं. कित्येक प्राण्याना ती अधिक लागते, कित्येकास ती कमी लागते. परंतु झोंपेचा काळ सरासरी मानानें आपल्या आयुष्याचा $\frac{1}{3}$ असतो व बहुतेक वैद्यशास्त्रनिष्णातांचें हेंच मत ग्राह्य आहे असें दिसतें.

( पु० चा० )

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १ शके १८१६

हल्लीं समाजाच्या व्यवस्थेचे जे मोठाले प्रश्न जगा पुढें आहेत त्या पैकीं लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न हा एक आहे. युरोपांत गरीब व श्रीमंत या लोकांमध्यें, तंटे, भांडणें आहेत आणि नुकतेच अमेरिकेतील स्वतंत्र संस्थानांत मजुरांनीं संप करून अंदाधुंदी मानविली त्या गोष्टीचें कारण पाहूं गेलें तर हाच प्रश्न मुळाशी आहे असें आढळेल. लोक संख्या आतांशा नको इतकी वाढूं लागली आहे आणि त्या अति वाढीमुळें वरील तंटे, संप, व अंदाधुंदी हीं फैलावत चालली आहेत. लोक संख्येच्या प्रश्नाचा विचार अठराव्या शतका पासून लोकांच्या बोलण्याचालण्यांत येऊं लागला. नाहींतर त्याच्या पूर्वींची स्थिती निराळी होती. गोल्डस्मिथ कवीचा मनु अगदीं हल्लीं पेक्षा निराळा होता Vicar of Wakefield या पुस्तकांत एक गोष्ट अशी आहे कीं एकेवेळीं बादशहा एका गांवीं आला असतां लोकांनीं त्यांस भेटीच्या वेळीं मोल्यवान नजराणे दिले पण एका गृहस्थानें नजराण्याच्या ऐवजीं आपलीं १७।१८ मुलें बादशहाच्या पायावर घातलीं. आणि मुलांचा नजराणा हा सर्वांत अमोल्य असा बादशहांस वाटला. त्या वेळच्या स्थितीला अनुरूप लोकाची समजूतच अशी कीं आपल्या देशा प्रीत्यर्थ ज्या गृहस्थानें इतकीं मुलें पैदा केलीं तोच खरोखर धन्य होय. त्या काळाला लोकसंख्या वाढविणें हेंच फार महत्वाचें होतें. वेदामध्यें देखील अशाच तत्वाच्या आज्ञा सांगितल्या आहेत. पण हल्ली तो मनु पालटला आहे. हंध्यां या विषयास उलट दिशा मिळालीच पाहिजे. युरोपांत लोकवस्ती फार वाढली व अत्यंत गैरसोय होऊं लागली तेव्हां कोलंबसानें त्या खंडावर मोठाच उपकार केला. अमेरिका सांपडल्यामुळें वरील गैरसोय प्रथम बरीच टळली आणि युरोपाला थोडा आराम वाटला. परंतु ही व्यवस्था किती दिवस चालावयाची? अमेरिका ओत प्रोत लोक वस्तीनें गजबजून गेली. आणि आस्ट्रेलेशिया सांपडली ती तरी वाढत्या लोकसंख्येला पुरणार कशी? हा प्रश्न कांहीं अशानें मिटण्या सारखाच नाहीं. माल्थस नांवाच्या विद्वान अर्थशास्त्रज्ञानें प्रथम या प्रश्ना विषयीं लोकांस जागृत केलें. त्यांच्या विवेचनानें आगामी लोकवृद्धीच्या विघ्नसमुच्चयाचें चित्रदर्शन उत्कृष्ट झालें. त्यानें असा सिद्धान्त काढला कीं लोकांचें उदरपोषण मूळ जमिनीच्या उत्पन्नावर आहे; आणि जमिनीच्या लागवडीची वाढ ज्या प्रमाणानें होते त्या प्रमाणापेक्षां फार भारी प्रमाण लोकसंख्येच्या वाढीचें आहे. या अर्थशास्त्रवेत्याच्या मतानें जमिनीच्या लागवडीची वाढ गणित श्रेढीनें होत असून लोकसंख्येची वाढ भूमितीश्रेढीनें होत आहे. न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला आणि जगावर उपकार केला याही पेक्षां अधीक हित माल्थसच्या सिद्धान्तानें केलें आहे. या लोकसंख्येच्या वाढीच्या गोष्टी लोकांपासुन गुप्त ठेवाव्या असा बहुत लोकांचा समज आहे. स्त्रियाना जसे पोटांतले रोग वैद्यास दाखविण्याची लज्जा वाटते त्या प्रमाणें समाजाच्या या रोगा संबंधानें लोकांचें वागणें आहे या सामाजिक रोगाची चिकित्सा माल्थस यानें उत्तम केली आणि त्यांच्या चिकित्सामुळेंच सुखानें राहण्यासाठीं Sociel scieuce वगैरे पुस्तकें निघालीं. कैलासवासी ब्राडला साहेब यांनीं राजकीय गोष्टींत या देशांवर बहुत उपकार केले परंतु त्या सर्वांत भारी उपकार ब्राडला साहेबांनीं जनसमूहावर सन १८७७ सालीं Fruits of Philosophy हा ग्रंथ प्रकाशित केल्यानें केला आहे. आनी बिझांट या विख्यात विदुषी बाई त्यांच्या साह्यकर्त्या होत्या. या ग्रंथांत या बाईचें पुष्कळ अंग आहे. यांत लोकसंख्या कमी करण्याचे कांहीं उपाय सांगितले होते. या ग्रंथप्रकाशना बद्दल ब्राडला साहेबांस दोन महिन्यांची सजा देखील झाली परंतु ते अखेर अपिलांत सुटले. या पुस्तकांतले उपाय चांगलेच आहेत असा कांहीं प्रकार नाहीं. पण जगाला भावी अरिष्टाची तार किंवा खूण या पुस्तकानें दिली ह्मणून त्याचें महत्व विशेष आहे. अशा प्रकारचीं पुस्तकें छापावींत किंवा नाहींत अशा विषयीं फार मोठा मतभेद आहे. परंतु बहूत विद्वान लोक असल्या ग्रंथप्रकाशनाला अनकूल आहेत. उभयता पितापुत्र मिल्ल साहेब असें स्पष्ट लिहितात कीं, समाजामध्यें मुख्य अपराधी झट । ह्मणजे जो अधीक मुलें उत्पन्न करितो तो होय. किंबहुना जगामधील कलह व लढाया यां चें बीज हेंच आहे. Empress V. Bradlaugh या पुस्तकांत हें उत्तम प्रकारें वर्णिलें आहे त्या पैकीं दोन मासले येथें देणें बरें. कांहीं उपाय केले तर त्या पासून पुष्कळ गोष्टी साध्य होण्या सारख्या आहेत. पैसा पुष्कळसा मिळाल्या शिवाय लग्नच करूं नये. याला उदाहरण येथील माजी हेड मास्तर मि. एटकीन यांचेंच देण्या सारखें आहे. ऐपत नाहीं ह्मणून बायकांचें लचांड टाळतात तेच सुविचारी लोक खरे. मजूरीचे दर वाढले तरी लोकसंख्या वाढल्यानें उदरभरणाचा खर्चही वाढला. सिद्ध केलें कीं लोकसंख्येची वृद्धी झालीच पाहिजे. खरोखर, हजारों लोकांस या विषयीं ज्ञान ह्मणून बिलकूल नसतें. याला उदाहरण वरील खटल्यांतील एका बाईची साक्ष पुरे आहे. तिनें सांगितलें कीं, आह्मी मुलें फार होऊं नयेत ह्मणून अंगावरच्या मुलला फार दिवस पाजीत असतो. मुलाला आई पाजविते तें पर्यंत पुढ मुलें होत नाहींत असा एक समज आहे. सरकारचा देखील या विषया संबंधानें मोठा गैरसमज आहे आणि ह्मणूनच अशा ज्ञानाचा प्रसार होत नाहीं. विलायतेंतील कित्येकांची दैना अशी सांगतात कीं मुलाबाळांना पुरेसें खायाला मिळत नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांना निजण्यास देखील जागा पुरेशी नसते. थोड्याच जागेंत फळ्यावर फळ्या घालून निजण्याचे मजले कारितात आणि कांहीं दुखणाईत असतात त्यांच्या उस्तवारी साठीं मुलांनाच आळीपाळीनें जागवितात. एकल्या दुकल्या आईबापांचा तरी निभाव संततिवैपुल्या पुढें लागावा कसा? मजूरदाराची अशी स्थिती होत चालली आहे तथापि लार्ड लोक स्वस्थ सुखांत आहेत. आणि ते ह्मणूनच या लज्य ज्ञानाचा प्रसार होऊं देत नाहींत. हा ज्ञानप्रसार झाला तर लढाई होणार नाहीं. लढाई नेहमीं संपत्ती विषयीं होते कांहीं ती संपत्ति आहे व ती पुष्कळास पाहिजे असते या ज्ञानप्रसारानें मनुष्य जातीचें सुख वाढेल आणि जगामध्यें कांहीं शिकावयाचें असेल तर ही गोष्ट आहे.

पाटील व पटवारी हे सरकारी नोकर आहेत आणि त्या अर्थी इतर नोकर लोकांच्या उत्पन्नावर जसा इनकम—ट्याक्स ( उत्पन्नकर ) आकारला जातो तसा पाटील व पटवारी यांच्या उत्पन्नावरही आकारण्यांत यावा असा हुकूम झाला आहे. कदाचित याच न्यायानें देशमुख व देशपांडे हे सरकारचे पेनशनदार आहेत तेव्हां त्यांच्या पेनशनच्या ह्मणजे रुसुमाच्या रकमेवर इनकम ट्याक्स आकारला जाईल अशी मोठी भिती आहे. इनकम-ट्याक्सची बाब वऱ्हाडांतील सरकारी कामदारास लागूं असून इतर प्रांतस्थ लोकांवर या कराचा बोजा नाहीं. इतर लोकांवर हा कर न बसविला जाण्याचें कारण असें दाखवितात कीं वऱ्हाडांत सरकारी नोकरा शिवाय जे लोक आहेत त्यांची गणना प्रत्यक्ष निजाम सरकारच्या प्रजाजना मध्यें होते. आणि इनकम ट्याक्स हा बादशाही कर आहे ह्मणून तो निजाम सरकारच्या प्रजेवर बसविला जात नाहीं. बहुतकरून हें किंवा असेंच दुसरें कारण दाखविण्यांत येतें. हें कारण जर योग्य व बरोबर मानलें तर याच कारणानें पाटील पटवारी यांच्या उत्पन्नावर ही नवीन कराची गदा घालता येऊं नये. पाटील पटवारी हे सरकारचे नोकर फक्त त्यांच्या कामाच्या दृष्टीनें आहेत. परंतु त्यांचें उत्पन्न, त्यांची वंशपरंपरेची नेमणूक व त्यांच्या मधील फेरपालट इत्यादि गोष्टी पुष्कळ पिढ्या पासून अव्याहत चालूं आहेत आणि सेव्यसेवकभाव लक्षांत घेतला असतां असें आढळतें कीं फक्त त्यांच्या नोकऱ्या इंग्रज सरकारच्या तैनातीला बदलून दिल्या आहेत. सर्व प्रकारें निजाम सरकारचें प्रजापण त्यांच्या अंगीं असून ही त्यांच्या उत्पन्नावर हा कर कां आकारला आहे हें आह्मास समजत नाहीं. वरिष्ट सरकाराकडे या प्रकारणात दाद फार लवकर मागितली पाहिजे आणि आह्मास आशा आहे कीं वऱ्हाडांतील पुढारी गृहस्थ सत्वर हा विषय हातीं घेतील.

---

सन १८६१ चा पोलीस आक्ट ५ वा हा यंदा दुरुस्त करण्यांत आला आणि या दुरुस्तीचें बिल मोठ्या आणिबाणीनें पसार करण्यांत आलें. या बिलाचे प्रवर्तक नामदार मॅकडोनाल्ड व त्यांचे साथीदार यांनीं वादयुद्ध करून बिल पसार करण्यासाठीं विडाच उचलला होता आणि अखेर त्यांच्या सदीचा जोर बहुमत करण्या इतका समर्थ असल्यामुळें नवीन भयंकर पोलीस कायदा अमलांत येत आहे. नामदार मेथा, मोहनीराय, चिटणीस आदिकरून स्वतंत्र मताच्या लोकांनीं वरील बिला विरुद्ध निक्षुन निक्षुन तक्रारी केल्या व उपसूचना आणिल्या परंतु सरकाराकडील मताधिक्यामुळें त्यांचा उपाय चालला नाहीं. या नवीन कायद्या अन्वयें जिल्हा-माजिस्ट्रेट हे बादशहा प्रमाणें अक्कम जिल्हा दंग्या धोप्याच्या वेळीं उलथा करून एकंत्र दाणादाण करून सोडूं शकतील. आपल्या दिलो प्रमाणें वाटेल त्या विशिष्ट लोकांस दंग्याचें प्रायश्चित्त देण्यासाटीं त्यांस दंगेखोर ठरवून त्यांच्या पैशानें आपल्या मर्जीतल्या लोकांचें नुकसान ते भरून काढतील. जिल्हा माजिस्ट्रेटास फार जबरदस्त अधिकार दंग्याच्या वेळीं दिले आहेत आणि त्यांचा उपयोग हो-

...रूपयोग होऊन अखेर नगरांतल्या ...यवतें, पुणें, उत्तर हिंदुस्थान ...आदि कडोला दंग्याच्या वेळचे-अनर्थ पुन्हा लोकांवर सरकारच्या अधिकार वर्गानें कोसळतील अशी मोठी भिती आहे. लोकसंरक्षणा करितां जे कायदे केले जातात त्यांत लोक मताला बिलकूल मान नसावा आणि कायदे-कौंसिलांतील अधिकारी मंडळीं-च्या जोरानें अनर्थावह कायदे बाहेर पडावे हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय!

मद्रास शहरीं मि. जिनवाला नांवाचे एक शहाण्याचे कांडे आहेत त्यांनीं आपल्या अक्कलेचे विलक्षण तारे लोकांनिदर्शनास आणिले आहेत. इंडिया सरकारास खजिना भरण्याची त्यांनीं एक उत्तम व अजब युक्ति सुचविली आहे. त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें नेटीव संस्थानें इंग्रजी राज्या मुळेंच सुखी, श्रीमान व निरायु झालीं आहेत तेव्हां त्यांच्यावर वार्षिक खंडणी बसवून खजिन्यांतली तूट भरून काढावी. कल्पना नामी असून असलीं चोरी व दरवडेखोरी राजकीय कारस्थानांत पवित्र होते. ही सूचना कोणास न्याय्य व सुविचाराची वाटत नाहीं तों पर्यंत वृथा काथ्याकूट नको होता परंतु अलीकडे आपल्या ...सांवलीला भिऊन चालण्या इतका कठीण काळ ...ला आहे.

नामदार दादाभाई नवरोजी यांची पार्लमेन्टांत निवड झाल्या मुळें या देशाच्या भाग्यकालास ...कार होतें राष्ट्रीय सभेचा ...इंग्लंडांत ... म गाण्याची खरी किंमत कळपण या... उत्तजणूं काय मि भावनगरा व मि. ...तार्ठींच हे राष्ट्रीय सभेच्या उलट मनोराज्यें ...उडीन लागले आहेत. अखेर लोकमताचाच ... होईल परंतु हे मध्यंतरीचे अपशकून व्यर्थ देशाभिमानी लोकांस शिणवीत आहेत. भावनगरी, रफीउद्दीन सारख्या शत्रूंच्या हेरांचा आपण वेळेवरच खरपूस समाचार घेतला पाहिजे.

वऱ्हाडांत देहान्त शिक्षा नाहीं अशा अपराधांची चौकशी करण्याचा डेपुटी कमिशनरास अधिकार आहे आणि त्यामुळें कित्येक सेशन कोर्टांत चालणारे खटले डेपुटी कमिशनर समोर चालून कधीं कधीं आरोपीचा मोठा तोटा होतो. आरोपींचा मोकद्दमा सेशनांत चालला तर त्यांच्या निकालांत असेसर्स लोकांच्या अभिप्रायाचा न्यायाधीशास फायदा होतो आणि त्यामुळें आरोपींस योग्य न्याय मिळण्याची अधिक शाश्वती वाटते. वऱ्हाडांत ज्युरीची पद्धति नाहीं आणि असेसरांची पद्धति सेशन खटल्या पुरती आहे तेव्हा एवढा स्वल्प तरी लोकांचा फायदा डेपुटी कमिशनरास विशेष हक्क दिल्यानें नाहींसा होतो तर कायद्यातलें हें वैषम्य दूर लवकरच होईल तितकें बरें! स्थानिक सरकार या ...कडे काहीं लक्ष पुरवील काय?

...र्डानें असें ठरविलें आहे कीं ...दुसऱ्यानें नेल्यास तिच्या ...र्डीत फिर्याद करिता येत नाहीं. हिंदुस्थानातल्या स्त्रिया कोर्टांत जाऊं

येऊं लागल्या नाहींत तों पर्यंत इंग्लंडच्या कायद्याचें हें तत्व इंडियास लागूं पडत नाहीं हें हायकोर्टानें विचारांत घेतलें असतें तर बरें!

The Berar Samachar

MONDAY MARCH, 11, 1895

## Leaders of Masses No. 2

If then antecedent causes limit the sphere of the activity of leaders of men, if they are thus the product of the antecedent activity, the question is why in the imagination of men they occupy such a prominent part? Yes! They are the apparent fruition of a long series of evolutionary development. The development of masses, the creation of nations is the resultant of a complex, ever variable aggregation of influences. In Mathematics given the intensity and direction of one or more forces the intensity and direction of the resultant is an assumed result. Not so in the growth of a people; hence is the difficulty of social status. It often strikes an observer that at a given epoch one universal idea or rather movement seems to stimulate a people. All their energy seems to be devoted to the realization of that one single idea. All natural aspirations tend to it. It pervades their whole life. That age, that epoch receives its definite phisiognomy from that one idea. The nation cling to it with extraordinary fondness even at the risk of forfeiting their traits of existence and intellectual and moral characteristics peculiar to it. At one time hakering after beauty pervaded the Grecian life, universal domination that of the Roman people, with us religious ecstacy filled the land, proselysing mission of Arabia; in our own days money-making in England. These unverisal ideas explain thoroughly and clearly the history of their respective epochs. ...he great and leading men were the Archite... ...ments of those ideas. What else come of tiid to their credit? The master Cæsar's triump... scuirtors are the out- The Caliphs emge of beauty in Greece. spirit. The ...the Roman Empire. religious ecstacy. ...e the proselysing ...stocracy and the s... accentuate the glorious traditions of powerful ari- free people of Englan... ignore the culate expression of the t... ...h of the making activity of England at ...ti- present day. The merit of the lea... of masses consisted in correctly re-cognising what was upper most in the heart of the masses. They foresaw it. Their genius saw clearly the direction in which the wind blew and sailed in that direction. It is extremely difficult nay, impossible except to extraordinary, sensitive and penetrating minds to gauge and ascertain what at one time is the impulse pervading the national mind. People who feel the impulsive aspirations are often under a vague consciousness of it. A difinite quantity is diffused through a gigantic almost it limitable mass and hence the peculiarities and virtues by which the idea could be recognised are lost in the shadows and immensity of the mass. But there it exists. But there it is working up i's way Extraordinary minds detect its existence. They touch the right cord in the universal mind and what was vague uncertain, unpalpable, airy nothing, the leaders solidify, and embody it in their own persons, in their own sayings and doings, in their ambition, in their emotions and achievements. And they succeed as much as the value of that idea deserves for their support. The general masses see in them their own self reflected in a distinct image and physiognomy. It is their idea and their enthusiasm before them in the glory of a palpable and substantial existence.

Now that the Cotton Duties Act XVII of 1894 is extended to Berar it is necessary to observe how far the Act is useless as regards the crude and agricultural state of this province though it has been most detrimental and destructive to the growth of the little industries of India. The recent Administration Report gives the following description of the manufacture of the province:—

"The manufactures of the province are chiefly confined to twist and yarn, coarse cotton cloth and petty unskilled handicrafts. Besides the cotton weaving mill at Badnera and two oil-mills, one at Amraoti and the other at Shegaon, the cotton presses and ginning factories worked by steam power are by far the most important industries in the province. The mill at Badnera produced 1,631,881 lbs. of twist and yarn, and 914,336 lbs. of cloth. Besides meeting local wants, the produce was exported to Delhi, Agra and the Central Provinces. The oil mill at Amraoti turned out 12,455 gallons of oil and 1,088 tons of oil cakes, while the Shegaon oil mill extracted 51,332 gallons of oil and 469 tons of oil cakes. There are altogether 36 cotton presses and 63 ginning factories, as against 28 and 58 respectively in 1892-93, under the management of private firms and joint stock companies."

### Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the usual Holi Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 18th. current.

## वऱ्हाड

मि. ओग्रेडी ए. अ. कमिशनर बडनेरा हे रजेवर गेले आहेत. त्यांचे जागीं बडनेरा स्माल काज कोर्टावर रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांस नेमिलें आहे.

रा. रा. नारायण पांडुरंग जोशी ए. अ. कमिशनर यवतमाळ यांनीं सहा महिन्यांची ...ा घेतली आहे.

व... सि. इ. बिडल्फ असि. कमिशनर वर... जा... ...व्हेन्ट म्याजिस्ट्रेट हे लवकरच रजे- आर... ...सारांश ...हे त्याचे जागेवर क्याप्टन स्माल क... ...ण्याची चिन्हे असि. कमि. व जज्ज खामग... ...त्यांकेंत शिल्लक ...व यांस नेमून त्यांचे दाळिया... ...ल्हीं कामें फारच उत्त... ...अथवा मु- यांस ...करूं लागले. व ...वी ...स्माल काज कोर्टांव... ...रत फारच मोत्विळवंत सुळे बी. ए. तहशी... लहानशीं इमा...यांस नेमणार आहेत.

हेद... सा... सरे... नं... तं... या... गो. एक दोन वेळ...एकस्ट्रा असि० रेसिडेंट ...डचणीमुळें ...यामुळें त्यांचे ५०० हींच झालें नाहे रा० गणपत बाबाजी नशीब जागृत! ...असि. कमिशनर रण्याचें पक्के आलें, ... हेड क्लार्कच्या समेचा तरी थाट वि... गणेश बापूजी भरलेलीं एकों मागून जनर, वाशिम

यांस नेमिलें हें कळविण्यास आनंद वाटतो. या दोन्ही नेमणुका फार उत्तम झाल्या आणि दोन ...रूप जबाबदारीच्या जागीं दोन चांगले अनुभविक गृहस्थ आले ही गोष्ट मि. ड्रौडन यांच्या गुणग्राही स्वभावाची साक्ष देते वरील नेमणुकी प्रमाणें रा. रा. गणेश बापुजी वाशीमाहून अकोल्यास येऊन हैदराबादकडे रवानाही झाले.

सुटी-- ~~शिमग्या व रंगपंचमी~~ ...सणा निमित्त 'वऱ्हाडसमाचार' चा तारीख १८-३-९५ चा अंक निघणार नाहीं. साल्याबाद प्रमाणें आमचे वाचक ही हक्काची रजा मोठ्या आनंदानें मंजूर करितील अशी आशा आहे.

'वऱ्हाड मार्जी हायस्कूल विद्यार्थी समाज' च्या वार्षिक समारंभास काल पासून खामगांवास सुरुवात झाली. सर्व व्यवस्था उत्तम ठेविली असून यंदा नाटकाचा प्रोग्राम असल्यामुळें पुष्कळ मंडळी यंदा बाहेर गांवाहून गेली आहे.

कर्नल मेकंझी साहेब बहादूर यांची स्वारी हैदराबादेस जाण्या करितां काल अकोला मार्गे रवाना झाली. साहेब महसूफांस ठिक ठिकाणीं पानसुपारी होऊन सर्वत्र लोक आनंदानें त्यांचा निरोप घेत होते. हे तेथें गेल्यावर रेसिडेंटचे कामाचा चार्ज घेतील आणि मि. ड्रौडन हे रजेवर जातील.

कर्नल मेकंझी यांच्या हातून इलिचपूरची लायब्ररी खुली करण्याचा समारंभ झाला हें कळवितांना आमच्या एका मित्रानीं त्या संस्थेचा संपूर्ण वृतान्त चांगला सुरस प्रकारें लिहिला आहे. पण तो मोठा असून उशिरा आल्यामुळें या अंकीं देता आला नाहीं. ह्मणून दिलगिरी वाटते.

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट नंबर ७ प्रमाणें

( वर्ग १९) दि. की. मि. नंबर $\frac{२}{१८९५}$

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव अयोध्या प्रसाद

बापाचें नांव सखाराम

राहणार पथरोट तालुके एलिचपूर.

जिल्हा एलिचपूर यास मयत.

बाळाराम बापाचे नांव शिवराम राहणार पथरोट ता० एलिचपूर जि० एलिचपूर यांनें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याच मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे ...शिवयांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १० माहे एप्रिल सन १८९५ इसवी रोजीं परतवाडा ...अगर स्वारी असेल तेथें सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १ माहे मार्च सन १८९४ इ०

H. Godwin Austen

Offg. Deputy Commissioner.

दि० व जज्ज एलिचपूर.

## वर्तमानसार.

...रुपयोग होऊन अखेर नगरांतल्या ... येवलें, पुणें, उत्तर हिंदुस्थान ...दि कडोला दंग्याच्या वेळचे अनर्थ पुन्हा लोकांवर सरकारच्या अधिकार बळानें कोसळतील अशी मोटी भिती आहे. लोकसंरक्षणा करितां जे कायदे केले जातात त्यांत लोक मताला बिलकूल मान नसावा आणि कायदे कौंसिलांतील अधिकारी मंडळीच्या जोरानें अनर्थावह कायदे बाहेर पडावे हें आमच्या देशाचें दुर्भाग्य होय!

महोब शहरीं मि. जिनवाला नांवाचे एक शहाण्याचे काढे आहेत त्यांनीं आपल्या अक्कलेचे विलक्षण तारे लोकांनिदर्शनास आणिले आहेत. इंडिया सरकारास खानिना भरण्याची त्यांनीं एक उत्तम व अजब युक्ति सुचविली आहे. त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें नेटीव संस्थानें इंग्रजी राज्या मुळेंच सुखी, श्रीमान व निरायु झालीं आहेत तेव्हां त्यांच्यावर वार्षिक खंडणी बसवून खजिन्यांतली तूट भरून काढावी. कल्पना नामी असून असली चोरी व दरवडेखोरी राजकीय कारस्थानांत पवित्र होते. ही सूचना कोणास न्याय्य व सुविचाराची वाटत नाहीं तों पर्यंत वृथा काथ्याकूट नको होता परंतु अलिकडे आपल्या सांवलीला भिऊन चालण्या इतका कठिण काळ आला आहे.

नामदार दादाभाई नवरोजी यांचे पार्लमेन्टांत निवडणुका झाल्या मुळें या देशाच्या भाग्यकालास ... राष्ट्रीय सभेचा इंग्लंडांत जयजयकार होत ... म गोष्टीची खरी किंमत ... पण या ...उत जणूं काय मि भावनगरा व ... ताठीच हे राष्ट्रीय सभेच्या उलट मनोराज्योंउदीन लागले आहेत. अखेर लोकमताचाच ...रूं होईल परंतु हे मध्यंतरीचे अपशकून व्यर्थ देशाभिमानी लोकांस शिणवीत आहेत. भावनगरी, राफीउदीन सारख्या शत्रूंच्या हेरांचा आपण वेळेवरच खरपूस समाचार घेतला पाहिजे.

वऱ्हाडांत देहान्त शिक्षा नाहीं अशा अपराधांची चौकशी करण्याचा डेपुटी कमिशनरास अधिकार आहे आणि त्यामुळें कित्येक सेशन कोर्टांत चालणारे खटले डेपुटी कमिशनर समोर चालून कधीं कधीं आरोपीचा मोठा तोटा होतो. आरोपींचा मोकदमा सेशनांत चालला तर त्यांच्या निकालांत असेसर्स लोकांच्या अभिप्रायाचा न्यायाधीशास फायदा होतो आणि त्यामुळें आरोपीस योग्य न्याय मिळण्याची अधिक शाश्वती वाटते. वऱ्हाडांत जुरीची पद्धति नाहीं आणि असेसरांची पद्धति सेशन खटल्या पुरती आहे तेव्हा एवढा स्वल्प तरी लोकांचा फायदा डेपुटी कमिशनरास विशेष हक्क दिल्यानें नाहींसा होतो तर कायद्यातलें हें वैषम्य दूर लवकरच होईल तितकें बरें! स्थानिक सरकार या ...कडे काहीं लक्ष पुरवील काय?

...र्डानें असें ठरविलें आहे कीं ... दुसऱ्यानें घेण्यास तिच्या ...दींत फिर्याद करिता येत नाहीं. हिंदुस्थानातल्या खिया कोर्टांत जाऊं

येऊं लागल्या नाहींत तों पर्यंत इंग्लंडच्या कायद्याचें हें तत्व इंडियास लागूं पडत नाहीं हें हायकोर्टानें विचारांत घेतलें असतें तर बरें!

The Berar Samachar

MONDAY MARCH, 11, 1895

### Leaders of Masses No.2

If then antecedent causes limit the sphere of the activity of leaders of men, if they are thus the product of the antecedent activity, the question is why in the imagination of men they occupy such a prominent part? Yes! They are the apparent fruition of a long series of evolutionary development. The development of masses, the creation of nations is the resultant of a complex, ever variable aggregation of influences. In Mathematics given the intensity and direction of one or more forces the intensity and direction of the resultant is an assumed result. Not so in the growth of a people; hence is the difficulty of social status. It often strikes an observer that at a given epoch one universal idea or rather movement seems to stimulate a people. All their energy seems to be devoted to the realization of that one single idea. All natural aspirations tend to it. It pervades their whole life. That age, that epoch receives its definite phisiognomy from that one idea. The nation cling to it with extraordinary fondness even at the risk of forfeiting their traits of existence and intellectual and moral characteristics peculiar to it. At one time hakering after beauty pervaded the Grecian life, universal domination that of the Roman people, with us religious ecstacy filled the land, proselysing mission of Arabia; in our own days money-making in England. These unverisal ideas explain thoroughly and clearly the history of their respective epochs. ... the great and leading men were the Archi... ments of those ideas. What else come of ... to their credit? The master Cæsar's tri...d scu...tors are the out- The Caliphs ...ve of beauty in Greece, spirit. The the Roman Empire. religious ecstacy. ...e the proselysing ...ocracy and the sp... accentuate the glorious traditions of ... powerful ari- free people of Engla... ignore the culate expression of the to...h of the making activity of Englan... ...ti- present day. The merit of the lea... of masses consisted in correctly ...cognising what was upper most in the heart of the masses. They foresaw it. Their genius saw clearly the direction in which the wind blew and sailed in that direction. It is extremely difficult nay, impossible except to extraordinary, sensitive and penetrating minds to gauge and ascertain what at one time is the impulse pervading the national mind. People who feel the impulsive aspirations are often under a vague consciousness of it. A difinite quantity is diffused through a gigantic almost it limitable mass and hence the peculiarities and virtues by which the idea could be recognised are lost in the shadows and immensity of the mass. But there it exists. But there it is working up its way Extraordinary minds detect its existence. They touch the right cord in the universal mind and what was vague uncertain, unpalpable, airy nothing, the leaders solidify, and embody it in their own persons, in their own sayings and doings, in their ambition, in their emotions and achievements. And they succeed as much as the value of that idea deserves for their support. The general masses see in them their own self reflected in a distinct image and physiognomy. It is their idea and their enthusiasm before them in the glory of a palpable and substantial existence.

Now that the Cotton Duties Act XVII of 1894 is extended to Berar it is necessary to observe how far the Act is useless as regards the crude and agricultural state of this province though it has been most detrimental and destructive to the growth of the little industries of India. The recent Administration Report gives the following description of the manufacture of the province:—

" The manufactures of the province are chiefly confined to twist and yarn, coarse cotton cloth and petty unskilled handicrafts. Besides the cotton weaving mill at Badnera and two oil-mills, one at Amraoti and the other at Shegaon, the cotton presses and ginning factories worked by steam power are by far the most important industries in the province. The mill at Badnera produced 1,631,881 lbs. of twist and yarn, and 914,336 lbs. of cloth. Besides meeting local wants, the produce was exported to Delhi, Agra and the Central Provinces. The oil mill at Amraoti turned out 12,455 gallons of oil and 1,088 tons of oil cakes, while the Shegaon oil mill extracted 51,332 gallons of oil and 469 tons of oil cakes. There are altogether 36 cotton presses and 63 ginning factories, as against 28 and 58 respectively in 1892-93, under the management of private firms and joint stock companies."

### Ourselves

Our subscribers will, we hope, allow us the usual Holi Holidays which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 18th. current.

## वऱ्हाड

मि. ओग्रेडी ए. अ. कमिशनर बडनेरा हे रजेवर गेले आहेत. त्यांचे जागीं बडनेरा स्माल काज कोर्टावर रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. यांस नेमिलें आहे.

रा. रा. नारायण पांडुरंग जोशी ए. अ. कमिशनर यवतमाळ यांनीं सहा महिन्यांची ...रजा घेतली आहे.

सि. इ. बिडल्फ असि. कमिशनर व ...ऍन्ट म्याजिस्त्रेट हे लवकरच रजेवर ... आर... सदरहू त्याचे जागेवर क्याप्टन स्माल का... ज्याचे असि. कमि. व जज्ज खामग... ज्यांकेत ...व यांस नेमून त्यांचे दाळेय... ली कामें फार ... अप्या मु... यांस ... करूं लागले. ब... कोर्टाव ... रत फार ... ...वील स्माल काज तहशी... लहानशी ... बळवंत सुळे बी. ए. ...यांस नेमणार आहेत. एक दो... हैद... हचणी ... एकस्ट्रा असि० रेसिडेंट हींच ... त्यामुळें त्यांचे ५०० स... नशीव ज... रा० गणपत बाबाजी ...रण्याचें पक्के ... असि. कमिशनर समेचा तरी य... हेड क्लार्कच्या ...स्या... भरलेली एको ... गणेश बापूजी ...क्षी. ...नर, वाशिम

यांस नेमिलें हें कळविण्यास आनंद वाटतो. या दोन्ही नेमणुका फार उत्तम झाल्या आणि दोन ...खप जबाबदारीच्या जागीं दोन चांगले अनुभविक गृहस्थ आले ही गोष्ट मि. ऑडन यांच्या गुणग्राही स्वभावाची साक्ष देते वरील नेमणुकी प्रमाणें रा. रा. गणेश बापुजी वाशीमाहून अकोल्यास येऊन हैदराबादकडे रवानाही झाले.

सुटी— ~~शिमगा व रंगपंचमी~~ —या सणा निमित्त 'वऱ्हाडसमाचार' चा तारीख १८-३-९५ चा अंक निघणार नाहीं. सालाबाद प्रमाणें आमचे वाचक ही हक्काची रजा मेहेरबानीने आनंदानें मंजूर करितील अशी आशा आहे.

'वऱ्हाड माजी हायस्कूल विद्यार्थी समाज' च्या वार्षिक समारंभास काल पासून खामगांवास सुरुवात झाली. सर्व व्यवस्था उत्तम ठेविली असून यंदा नाटकाचा प्रोग्राम असल्यामुळें पुष्कळ मंडळी यंदा बाहेर गांवाहून गेली आहे.

कर्नल मेकंझी साहेब बहादूर यांची स्वारी हैदराबादेस जाण्या करितां काल अकोला मार्गें रवाना झाली. साहेब महसूफांस ठिक ठिकाणीं पानसुपारी होऊन सर्वत्र लोक आनंदानें त्यांचा निरोप घेत होते. हे तेथें गेल्यावर रेसिडेंटचे कामाचा चार्ज घेतील आणि मि. ऑडन हे रजेवर जातील.

कर्नल मेकंझी यांच्या हातून इलिचपूरची लायब्ररी खुली करण्याचा समारंभ झाला हें कळवितांना आमच्या एका मित्रांनीं त्या संस्थेचा संपूर्ण वृतान्त चांगला सुरस प्रकारें लिहिला आहे. पण तो मोठा असून उशिरा आल्यामुळें या अंकीं देता आला नाहीं. ह्मणून दिलगिरी वाटते.

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट नंबर ७ प्रमाणें (वर्ग १५) दि. की. मि. नंबर $\frac{२}{१८९५}$

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव अयोध्या प्रसाद
बापाचें नांव सखाराम
राहणार पथरोट तालुके एलिचपूर.
जिल्हा एलिचपूर यास मयत.

बाळाराम बापाचे नांव शिवराम राहणार पथरोट ता० एलिचपूर जि० एलिचपूर यांनें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याच मालमिळकतीवर किंवा तिच काहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे ...र्ने कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १० माहे एप्रिल सन १८९५ इसवी रोजीं परतवाडा ...मुक्काम ... स्वारी असेल तेथें सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १ माहे मार्च सन १८९४ इ०

H. Godwin Austen
Offg. Deputy Commissioner
दि० ज. जज एलिचपूर.

## वर्तमानसार.

रशिया व इंग्रज यांच्यांत स्नेहसंबंध वाढविण्यासाठींच काबूलचा अमीर इंग्लंडास जाणार आहे असें ह्मणतात. अमीरानें जाण्याचा विचार नक्की ठरला आहे

दुधांत भेळसेळ करून तें विकल्या दल कलकत्यास वीस गवळ्यांनीं दंडाच्या शिक्षा झाल्या.

मद्रास रेल्वे कंपनीतील तीन हजार मजूरांनीं संप करून काम बंद पाडलें होतें; तेव्हां कंपनी मुकाट्यानें त्यांचे ह्मणणें कबूल करण्यावर आली.

सर हद्दीवरील चित्रालच्या बांधपांत इंग्रजांचें बरेंच लष्कर रवाना झालें आहे.

इजिप्त देशांत मुसलमानांचा व युरोपियन लोकांचा बराच तंटा होत असून आरब लोक इंग्रजांवर चाल करून जाण्यात अगदीं बेताल होऊन गेले आहेत असें कळतें.

रक्तपितीवर फायदा करणारें औषध— एक मातीचा डेरा घ्यावा, त्यांत १ शेर आंवळसार गंधक व डेरा भरेल इतक्या गाढवाच्या लेंड्या घेऊन, त्या दोन्हींची बारीक पूड करून, त्यांनीं सर्व डेरा भरावा. डेरा गळ्यापर्यंत भरत आला ह्मणजे त्यांत एक वाटी टेवावी. नंतर त्या डेऱ्याचे तोंडावर एक धातूचें भांडें तपेल्या प्रमाणें उपडें घालावें. व या भांड्याचे तोंड, डेऱ्याचे तोंडाचे आंत जाईल असें असावें. फट राहिल्यास चिकणमातीनें ती बुजवून टाकावी. मग डेरा चुलीवर ठेऊन त्या खालीं मध्यम आंच लावावी; ह्मणजे अर्क निघून तो डेऱ्यांतील वाटींत पडेल. तो अर्क नित्य सकाळीं एक तोळा व सायंकाळीं एक तोळा असें दिवसांतून दोन वेळां ४० दिवस पर्यंत देत जावा. ह्मणजे उत्तम फायदा होतो. स० वि०

आस्ट्रेलियांत घोड्यांना लोखंडी नाल न मारतां गाईच्या कातड्यांचे नाल बनवले असतात ते ठोकण्यात येतात.

लष्कराची खावटी— इंग्लंडच्या सेनेला दररोज चार लाख रुपये नुस्ते खाण्यापिण्यास लागतात असा हिशेब निघाला आहे.

नवीन पेटंट–मेसर्स टी. एस. रामचंद्र आणि कंपनी, वाद्यांचे पेढीचे व्यापारी पैकीं रामचंद्र नरोत्तम यांनीं एक नवीन वाज्याच्या योगानें वाजणारें यंत्र तयार केलें असून त्याचें पेटंट घेतलें आहे असें समजतें. अशा तऱ्हेचे वाद्याचे पेटंट घेतलेले हे पहिलेच गृहस्थ आहेत, याबद्दल त्यांचें, अभिनंदन केलें पाहिजेच.

कैदी मंजूर— ह्मसवड येथें एक कंत्राटदारानें कैदी लोक मजुरीवर घेण्याची मजुरी मिळविल्यामुळें एरवड्याच्या तुरुंगांतून परवां ११० कैदी तिकडे पोलिसाच्या ताब्यांत रवाना झाले. तसेंच हुबळीहून स... तीनशें कैदी नुकतेच तिकडे रवाना करण्यांत आले.

बार्शी रेल्वें— बार्शीरोडपासून बार्शी शहरापर्यंत रेल्वे करण्याची स्टेट सेक्रेटरीनीं परवानगी दिली असें समजतें.

जर्मनीमध्यें कांहीं रेल्वेस्टेशनांवर राघू ठेविले आहेत. ते, कोणताही गाडी निघावयाची असली ह्मणजे त्या गाडीचें नांव— ह्मणजे ती कोणत्या स्टेशनांस जाणार तें,— मोठ्यानें ह्मणत असतात. त्या मुळें उतारू लोकांस विचारपूस करावी लागत नाहीं.

न्या० सिं०

सुटले:–जतोरच्या राजानें जबरदस्तीनें एका डाक्टराकडून ५००० रुपयांचा दस्तऐवज लिहून घेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांच्यावर खटला होऊन सेशन जज्जांनीं २५००० रुपये दंड व ६ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा दिली होती. यावर अपील हायकोर्टांत होऊन राजाला दोषमुक्त केलें. क० त०

डोळ्यांतील फुलास— हेळूची बी उभी घरून ती पाण्यांत उगाळून अंजन करावें; ह्मणजे नवीन पडलेलें फूल त्वरित दूर होतें. हेळूचा वृक्ष कोंकणांत प्रसिद्ध आहे. यास उंबराएवढीं फळें येतात, व तीं आंबट असतात. या फळास अळूं असेंही ह्मणतात.

√रेचक चूर्ण— निशोत्तर १ तोळा, खडीसाखर १ तोळा व पिंपळी १ मासा यांचें चूर्ण करून, ते ६ मासे चूर्ण. पाण्याशीं रात्रीं निजते वेळीं अगर सकाळीं द्यावें ह्मणजे रेच होतात. हें रेचक तीव्र नसून ज्यांचा मृदु कोठा आहे त्यांस उत्तम प्रकारें लागू पडतें. ज्यांस बद्ध कोष्ठाचा उपद्रव आहे त्यांस हें रेचक फार उपयुक्त आहे.

√डांग्या खोकल्यास— हा खोकला लहान मुलांस होतो, व याचा फार जोर असतो. नेहमीं मूल मोठ्यानें "खो खो" अशा स्वराचे खोकत असतें; यावर बेलूची गांठ व सूंठ ही उगाळून द्यावी. २ सतापाचा पाला गळ्यांत बांधावा. ३ उटकऱ्यारीचें मूळ गळयांत बांधावें.

√जलोदरास— कंवडळीचें फळ आणून आडवें चिरून दोन भाग करावें. मग त्यांत हिरा हिंग २ तोळे घालून दोन्ही फोडी सुतानें गुंडाळून वरून कणकीचा लेंप करावा. त्यावर मातकापड करून रानशेणींत अग्नि द्यावा. भाजल्यावर तें फळ काढून रोज वालप्रमाणें भक्षित जावें.

√ओकारीस— वडाची पिकली पानें आणून, जाळून राख करून ती तीन वर्षांच्या जुन्या गुळांतून द्यावी. ३ दिवस.

√उलटी होऊन विष पडावयास— देवडांगर, यांस कोणी पित्तफळ असेंही ह्मणतात, तें आणून वांटून पाण्यांत भिजुं घालून तें पाणी नवटांक प्यावें, ह्मणजे उलटी होऊन विष पडेल.

√वीर्य वृद्धीस— आंवळकठी, [illegible] त्रक, शतावरी, गोखरूं गुळवेलसत्व, ज्येष्ठमध, पिंपळी याचे सम येत [illegible] तें रात्रीं शक्ती प्रमाणें [illegible] करण होत [illegible] यांत मिश्र करून [illegible] उते अडून [illegible]

[illegible] सें कोणतेंच नाहीं. तेव्हां [illegible] आहे. या करितां जेवढें [illegible] च्या चौपट ऊन केलेल्या [illegible] घालून मिळवून घ्यावें; [illegible] तें न कळत घेतात— [illegible] जनेल.

पोटांत चुकून खि[illegible] बटाटे जास्त खावे; [illegible] त तो [illegible] नसून [illegible] ठिकिक ? अमेरिक [illegible]

विशेषीं ते फ दु[illegible] जाण्यातणें [illegible] चाही नित्या [illegible] काय जातेत [illegible] मचा गडी [illegible] केलेली. असो. दूर गेलों. अशा [illegible] ली. ते सदृगृह [illegible] त्यामुळें अन्यत्रा [illegible] आपली झांक [illegible]

मांचुरियाच्या पूर्वभागांतील किरण हद्दीवरचा एक तार्तरी माणूस जपानच्या छावणींत आला व चीनच्या बरोबर लढाई करण्याकरतां ६०,००० फौज तुमच्या मदतीस देण्यास मी तयार आहे, असें त्याणे जपानी कमांडरास सांगितलें. जपानी कमांडरानें त्याचे आभार मानून तुर्त तुमच्या फौजेची जरूरी नाहीं असें सांगून त्याच्या वाट चालीचा खर्च देवून त्यास वाटेस लावलें.

निझामाचे प्रधान हे न्यायखात्याची सुधारणा करण्याच्या मागें लागले असून लवकरच चांगलें व्यवस्थित असें एक हायकोर्ट स्थापन करण्यांत येणार आहे.

शीक पल्टणींतील १०० लोक गिलजित येथून मस्तज येथें रवाना केले व काश्मीर इम्पेरियल फौजेंतील १०० लोकही तेथें पाठविण्यांत येणार. उमराखानकरता ही सर्व तयारी दिसत्ये.

इजिप्तदेशांतील ज्या लोकांनीं इंग्रजकामदार व इतर इंग्रज लोक याच्या विरुद्ध गुन्हे केले त्याचा इन्साफ करण्याकरतां इंग्रज व इजिप्त अशा मिश्र कामदारांचें एक स्पेशल कोर्ट बसणार व त्यांच्या ठरावावर अपील नाहीं असा त्या कोर्टास अधिकार देणार.

सरहद्दीवरच्या लोकांनी मोरोको शहरावर हल्ला करून सुलतानाच्या फौजेशीं लढाई मारून शहराची लूट करून नेली.

मेडिटरेनियन येथील आपल्या अरमारास पासिफिक येथें जाण्यास तयार व्हावें असा रशियानें हुकूम केला आहे.

चिनीमुखत्यार ली हुंग चंग हा जपान येथें आल्यावर त्यांच्याशीं तहाचें बोलणे सुरू करण्यास जपान तयार आहे, कारण आतां तहाचें बोलणे न केल्यास आपल्याविषयीं इंग्लंड, रशिया व फ्रान्स यांच्यांत आपला दुर्लौकिक होईल असें जपानास वाटत आहे अशी बोलवा आहे.

जपानी फौजे फार्मोसा बेटावर [illegible] करून जाण्याच्या तयारींत [illegible] असें सांगतात.

वेई वई व निवई [illegible] आसपासचीं [illegible] जपानी फौजेनें [illegible] ठाणीं उठविलीं व बहुतेक फौज [illegible] एकीकडे रवाना केली.

बेरूट ह्मण[illegible] जे. लोक मस्कत शहरा[illegible] सर्वांस त्यांच्या सुरक्षितपणें [illegible] दुसरीकडे नेलें आहे.

[illegible] आपला फौजे मादागास्करावर [illegible] करतां इंग्रजांचीं कांहीं गलबतें खरेदी केलीं.

इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत हल्लीं जितकें सख्य आहे तितकें यापूर्वी कधीं ही नव्हतें असें फ्रेंचदरबारचे इंग्रजवकील लार्ड डफरीन यांचें ह्मणणे आहे.

एक तरुण विधवा नाशवील येथें जाण्याकरतां लुइशवील येथें आगगाडींत बसली. त्याच डब्यांत एक नुतन विवाहित जोडपें बसलें होतें; त्याच्याच शेजारीं ही विधवा जाऊन बसली तेव्हां त्या तरुण जोडप्यांतील तरुण स्त्रीचा तरुण नवरा आपल्या बायकोजवळून उठून जरा एकीकडे जाऊन बसला. इतक्यांत ती आगगाडी एका बोगद्यांत आली आणि गाडींत अंधेर पडला. त्या अंधेरांत संधींत तो एकीकडे बसलेला तरुण नवरा आपल्या बायकोजवळ आला व बायकोच ह्मणून मुका घेतला. पण अंधारांतून चुकून त्याणे आपल्या बायकोचा मुका घेण्या ऐवजीं त्या तरुण विधवेचा घेतला! व या प्रकरतां त्या विधवेनें त्याच्यावर अलाबामा येथील कोर्टांत एक हजार डालरचा दावा केला आहे.

इंग्रजसरकारची एक फौज आफ्रिकेंतल्या लोकांवर चाल करून गेली होती. व त्या फौजेची त्या लोकाशीं एक मोठी लढाईही झाली व त्यांत ले. टेलर व दोन खलाशी असे ठार होऊन दुसरे पांच घायाळ झाले.

ठा० अ०

---

नोटीस

रा. रा. (१) बळीराम (२) आकाराम (३) मोहनसिंग हरबानी राहणार कुरणखेड ता. आकोला या त्रिवर्ग बंधूंस नोटिस देण्यांत येते कीं मी खाली सही करणारीण कैलासवासी सुकदेव भगवानदास याची वारसदार असून ऋणको राजाराम देवाजी देशमुख राहणार कुरणखेड याचें शेत कर्जफेडीत लाऊन घेतलेलें तुह्माकडे निम्या बटाईनें दिलेलें आहे पण अद्याप वायदा भरण्याची तजवीज तुह्मी केली नाहीं व शेतांतील सर्व माल लपंडावानें गडप करून बसला आहा तर आमचें नुकसान, नोटिशीचा खर्च, शेकडा दुहोत्रा व्याजा प्रमाणें व्याज मिळून सर्व रक्कम कोर्ट मार्फत वसूल केली जाईल. आणि त्याच प्रमाणें तुह्मास [illegible] यासाठीं मोहबतीनें दोन चार दिवस मुदत दिली [illegible] नोटीस पोंचताच ताबडतोब परत करावा. तारीख ६ मार्च १८९५ [illegible]

(रिसीस [illegible])

[illegible] केसरबाई [illegible] रामनाथ [illegible] जीव [illegible] नैपत सुकदेव भगवानदास याची वारसदारीण इच्छा [illegible] हातची निशाणी.


घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मागरा. कांटे रासकोपप्रमाणें, आंकडे ठळक चिनीरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ७ १०८
किरकोळ अंकास ........ ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०१०६
दुसरे खेपेस ........ ०१

# वऱ्हाडसमाचार.

Single copy.................. 4 as

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as.
Repetition Per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX | AKOLA MONDAY 25 MARCH 1895 | NO. 11

वर्ष २९ | आकोला सोमवार तारीख २५ माहे मार्च सन १८९५ इ० | अंक ११

## इलिचपूर लायब्ररी

पत्रकर्ते महाराज, येथें पुस्तकालय आहे परंतु या मंदिरांत सरस्वतीचा वास सतत होण्या सारख्या सोयी नव्हत्या. सरस्वतीचा महिमा मोठा अगाध खरा! इतिहासकारांनीं तिला नीतीची जननी ह्मटलें आहे तें अक्षरशः बरोबर आहे. मीमांसाकार, इतिहासवेत्ते, वैय्याकरणी, न्यायशास्त्रकर्ते, कादम्बरीकार, आदिकरून ग्रंथकारांनीं तिच्या भजनांत कालक्षेप करून सर्व जगावर अतुल उपकार केले आहेत. तिच्या ज्ञानदीपानें सर्व जग प्रकाशमय झालें आहे. पण अशा श्रेष्ठ ज्ञानजननीचें आमच्या गांवीं योग्य आदरातिथ्य कोठून होणार! तिचें वसतिस्थान इलिचपूर शहरीं होण्यासाटीं ज्या भक्तांनीं पुढाकार घेतला ते आरंभीं जननिंदेस पात्र झाले पण सरस्वतीच्या नाममहिम्यानेंच 'शेवट मात्र गोड झाला' आणि या भक्त मंडळीस यशश्रीनें माळ घातली. विहितच आहे कीं:—

विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥
प्रारभ्य उत्तमजना न परित्यजन्ति ॥

स्थापना.

सरासरी आठ नऊ वर्षांपूर्वी सरस्वतीचें मनांत आमचे गांवीं आपलें स्थान असावें असें आलें. वास्तविकच आहे. सज्जनांचे देह परोपकारार्थच झिजावयाचे तदनुसार या बाईनें कांहीं सद्गृहस्थांचें मनांत प्रेरणा केली. या बाईचें स्थान आपल्या गांवीं नसावें असें कोणास तरी वाटेल काय. कारण या बाईच्या कृपेनें तर आमच्या आयुष्याची इमारत तयार होणार. पण, महाराज, तसेही लोक मिळाले. मात्र ईश्वरी इच्छेपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. व या बाईला नबाबाच्या महालाच्या दरवाज्यावर घर बांधून दिलें. हें सर्व श्रेय रा. रा. गणेश बापुजी (त्यावेळीं असलेले तहसीलदार), बाळकृष्ण काशिनाथ जोशी व पांडुरंग बाळकृष्ण लिमये यांना आहे. त्यांनीं लोकांस हिच्या पासून होणारे फायदे सांगून तिला लोकांकडून यथाशक्ति हातभार देण्यास अश्रांत श्रम केले. सार्वजनिक हिताचे कामाकरितां आपल्या योग्यतेला, अधिकाराला, व विद्वत्तेला एकीकडे ठेऊन दारोदारीं भिक्षार्थी जनाप्रमाणें हिंडणारे फारच विरळा. व ह्मणूनच ते यशस्वी. त्यांची थोरवी अधिक. नाहींतर आह्मांला पुस्तकें वांचून काय कादंबरी रचावयाची आहे? किंवा ज्ञान मिळवून विद्वत्तेची शेखी मिरवावयाची आहे? रिकाम टेकडे पुष्कळ! पुस्तकांचें सदन बांधलें आहे. आह्मास ईश्वरानें पुष्कळ दिलें आहे" असें घरीं स्वस्थ बसून वाग्देवीस यथेच्छ विहार करण्यास सांगणाऱ्या लोकांनां जर यश येऊं लागलें तर देशोन्नतीची आशाच नको. ज्ञान हा शब्द तर कोशांत घालण्याची गरजच नाहीं. चांगला व वाईट हे शब्द एकार्थाचे झालेच ह्मणावयाचे. परग्रामस्थ लोकांनीं रात्रंदिवस खपून यथाशक्ति आश्रय देण्याकरितां यःकश्चित मनुष्याची विनवणी करावी व मोठ्या उत्साहानें पदर पसरावा. आणि ज्यांच्या करितां इतकें केलें त्या आह्मी ग्रामस्थ लोकानीं हात भार देण्याचें तर एकीकडेसच राहिलें पण समूळ नाश व्हावा हेंच आपलें महत्कृत्य! व तदर्थ उपदेशकाचें काम स्वीकारून कितपत यशस्वी झालों याचें आपणच सिंहावलोकन करावें व आनंदसागरांत मग्न होऊन सहस्र भोजनाचें पुण्य मिळालें असें समजून मान डोलवावी हें तरी भूषणच ना! मात्र ध्यानांत इतकें पूर्णपणें ठेविलें पाहिजे कीं कोर्टाच्या कामांत विनाकारण विरुद्ध पक्ष घेतला तर कदाचित् पुराव्याच्या पाठबळानें जसा यश येण्याचा संभव आहे तसा अशा कामांत मुळींच नसतो. सार्वजनिक कामें व्यक्तिमात्रावर अवलंबून नसून जनसमूहावर अवलंबित असतात. व अशा कामांत वाईटाचा वांटा कांहींच नसल्यामुळें त्याला कोठेंच धक्का पोहोंचत नाहीं. आतां ही एक गोष्ट निराळी. कावीळ झालेल्या मनुष्यास सर्व पिवळेंच दिसतें किंवा मादक पदार्थ सेवन करणाऱ्यास जें मी बोलतों तें सर्व खरें व सप्रमाण व लोक कांहींतर बरळतात असें वाटतें. परंतु कावीळ झालेल्यास जसें दुसरें औषध द्यावें लागतें, दारूवर जसें लिंबू व थंड पाणी याचे उपचार करावे लागतात तशी लायब्ररी सारख्या संस्थेस पाहून रागावलेल्यास अन्य औषधाची गरज नाहीं. त्याला लायब्ररीच औषध आहे एकदां कां एखादें चांगलें पुस्तक वाचण्यांत आलें कीं त्याचें एक एक पान निशेचा एक एक अंश उतरवून टाकतें. व आपण बोललों काय, करीत काय होतों! आहे काय! नाहीं काय! असें त्याचें त्यालाच वाटूं लागतें; व निशा उतरल्यावर जशी सुस्ती येते तशी खंति आपला अमल बसवितें. त्यांत कित्येक सखीचे लाल याच खटपटींत असतात. एकानें चांगलें ह्मटलें कीं त्यांनीं वाईट ह्मणावयाचें व इतरांस ही तसें ह्मणण्या विषयीं हट्टास पेटवावयाचें; व एकदां कां हट्टाची सीमा झाली कीं मग दुरून मौज पहावयाची हाच त्यांचा धर्म, यामुळेंच त्यांचा ज्यास्त मान, व बुद्धिवानांत गणना! मग त्यांचेकडे काय दोष! आणि त्यांस, जसजसें अशा कामांत यश येत जाईल तसतसे त्यांचें गुणाचे दृढीकरण होत जाईल. अपयश जरी आलें तरी ते अडून गमत पहाणारे असल्यामुळें प्रसंग विशेषीं ते कोणास दोष देण्यास किंवा सोडून जाण्यास आनंदानें तयार होतील याचाही नियम नाहीं. मग त्यांचें त्यांत काय जातें? ज्याचें नाक वर होईल तो आमचा गडी येथपर्यंत त्यांची मजल पोहोंचलेली. असो. प्रस्तुत विषया पासून फार दूर गेलों. अशा रीतीनें लायब्ररी स्थापन झाली. ते सद्गृहस्थ रुपेरी शृंखलेनें बद्ध असल्यामुळें अन्यग्रामीं निघून गेले व दीनावस्था आपली झांक या संस्थेवर दाखवूं लागली. वर्गणीदारांची संख्या ही थोडी. त्यांतून देणारेही तितकेंच. मनुष्याचा पगार निघेना! आठ आठ दिवस लायब्ररीचें कुलूप उघडतें कशाला! इतकी काळजी कोणास! खटपट करतो कोण! फुकट वेळ दवडावा कोणी! स्थापन करणाऱ्या सद्गृहस्थानीं पुस्तकांकरितां व इमारती करितां लोकांकडून वर्गणी मिळवून रक्कम व्यांकेंत ठेविली होती; व तिचा विनियोग यथावकाश त्या त्या कामाकडे करण्याचा संकेत केला होता परंतु वर्तमानपत्रकारांच्या मागण्यावर मागण्या येऊं लागल्यामुळें त्या रकमेंतून त्या पाठविणें भाग पडलें. सारांश कांहीं दिवस गांवांत लायब्ररी आहे या पलीकडे कांहीं एक नव्हतें असे विचारीनें कांहीं दिवस निकृष्टावस्थेंत काढले:—

पुनरुज्जीवन

मधून मधून रा. रा. नारायणसिंग तहसीलदार यांनीं आपल्या थोड्या अवकाशांत खटपट केली व त्यांनां यशही आलें. परंतु त्यांचें वास्तव्य येथें थोडा वेळ होत गेल्यामुळें तें तितक्या पुरतेंच होतें. पण, महाराज, ॥ नीचैर्गच्छत्युपरिच दशा चक्रनेमिक्रमेण ॥ हा न्याय ज्या प्रमाणें जीवमात्रांस लागूं आहे त्या प्रमाणें तिलाही लागूं आहेच. विचारीची साडेसाती निघाली! कष्टाचे दिवस एकदाचे गेले!!! रा. रा. व्यंकटराव देशमुख यांनीं तिला पुनः उज्जीवित दशेस आणण्याचा प्रयत्न सुरू केला. रोज संध्याकाळीं पांच दहा मंडळीसह लायब्ररींत येऊन वर्तमानपत्रें, पुस्तकें वाचण्याचा परिपाठ घातला. वर्गणीदार होण्याविषयीं लोकांचीं मनें वळविलीं. आमचें गांव हट्टास जसें लवकर पेटतें तसेंच वळतें ही पण लवकरच. एकदम दिशा बदलली. इतर होतकरू मंडळींचें त्यांना सहाय मिळालें. सभा वगैरे नेमस्तपणें भरूं लागल्या. वर्गणी ही कालमाना प्रमाणें बरीच येऊं लागली. रा. रा. गिरराव रामचंद्र तहसीलदार यानीं कमेटीतून दरमहा ७ रुपये लायब्ररीस देवविण्याबद्दल बरीच खटपट केली. व त्यांना यशही आलें. या रुपयांचा व्यय पुस्तकें आणण्याकडे होऊं लागला. सारांश पुनः लायब्ररीची स्थिति चांगली होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. खर्च जातां व्यांकेंत शिलक पडूं लागली. सेक्रेटरी आपलीं कामें फारच उत्तम रीतीनें व कळकळीनें करूं लागले. व वार्षिक सभेंत हल्लीची इमारत फारच मोडकळीस आल्यामुळें नवीन लहानशी इमारत बांधावी या विषयीं ऊहापोह एक दोन वर्षें होत गेला. परंतु पैशाच्या अडचणीमुळें वादविवादा शिवाय ज्यास्त कांहींच झालें नाहीं. एक दिवस झालें तिचें नशीब जागृत! मंडळीच्या मनांत प्रयत्न करण्याचें पक्कें आलें, व सभा भरविण्याचें ठरलें. सभेचा तरी थाट विलक्षणच! पूर्ण आवेशानें भरलेलीं एका मागून एक भाषणें होऊं लागलीं. व आंकडे टाकण्यास सुरुवात झाली. कोणी १००, कोणी ५० कोणी ३० तर कोणी २५ या प्रमाणें हां हां ह्मणतां एका घटकेंत सहा सातशें वर्गणी झाली. मग काय! रोज एक एक महेला या प्रमाणें मोठाली मंडळी पायीं, उन्हांत, भुकेली, एकाच्या हातीं भिक्षेची झोळी व दुसऱ्याच्या जवळ कागद वगैरे या प्रमाणें हिंडले व लोकांची हात जोडून विनवणी केली. असा गांवांतून एक सारखा आठ दिवस थाट चालला होता. कमेटीनेंही पांचशें रुपये दिले व लोकांकडून सरासरीं २२०० रुपयांचे आंकडे पडले. जागा शोधून कामास एकदम सुरुवात झाली. पाया भरला गेला. व विजया दशमीच्या सुमुहूर्तावर खानबहादुर नबाब शमसुद्दिन अलिखान यांचे हातून मोठ्या थाटानें अग्रशिला न्यासाचा समारंभ झाला. व इमारतीचें काम झपाट्यानें सुरू झालें. इमारतीचें काम सुरूं झाल्यापासून सुमारें १५ दिवस पहाटेस, दुपारीं, संध्याकाळीं मंडळी येऊं जाऊं लागली. कामावर देखरेख ठेऊं लागली. पुढें काय झालें कोण जाणे. लायब्ररीवर

दगडांचा वर्षाव

होण्यास सुरुवात झाली. एकदम वारा उलट दिशेस वाहूं लागला. पूर्वीची हकीकत स्वप्नवत् वाटूं लागली. रा. रा. व्यंकटराव देशमुख, नरहरबाबा देशपांडे व उत्तमराव ना. त. व त्यांचीच कांहीं संसर्गिक मंडळी या शिवाय कोणीच दिसेना. व या मंडळीवर झाला लोकोपवादाचा दगड येण्याचा आरंभ! लायब्ररी ह्मणजे महत्पापाचें कृत्य असा सिद्धांत ठरला. ही मंडळी स्वार्थीकरितां मेहनत करीत आहे असा या मंडळीच्या नांवावर मिळाला शेरा. वर्गणी वसूल झाली ती झाली. आतां वसुलाच्या नांवानें पूज्य. गांवांत नानाप्रकारच्या कंड्या उठूं लागल्या. वसुलाविषयीं तर कडेकोट बंदोबस्त झाला. अमुकाची लायब्ररी असें कित्येक सखीचे लाल निर्भयपणें ह्मणूं लागले. मग काय विचारता? या मंडळीची तर धांदल उडून गेली. कोणीकडे आपण या कामांत पडलों असें त्यांना झालें. एकदां कां दैव फिरलें ह्मणजे विघ्न कोणीकडून डोकावून पाहील याचा नियम नाहीं. कसें तरी हातीं घेतलेलें काम टाकतां येत नाहीं ह्मणून काम चालूंच ठेविलें. काम अर्धें पुरें होतें न होतें तों जवळचा पैसा संपला कारण वर्गणी येणें तर बंद पडलें. लोक लागले मग हंसायाला. काम तर हांकतां येईना. पैसा तर संपला लोकांस तर महोत्सवासारखा आनंद झाला! कोणी धड गोष्ट सुद्धां करीना. अनुलक्षून बोलण्याचा तर झाला सपाटा सुरू! मंडळी चिंतेनें ग्रासली गेली. काम झालं! इमारत तर तुमचीच आहे हें तर साहजिक बोलणें! किल्यांत येऊन इमारतीकडे दृष्टी गेली कीं देह विटाळला! घरीं जाऊन स्नान करून

देखापुढें तुपाचा दिवा लावण्यासारखें झालें होतें, जें होईल तें होवो! काम तर मध्यें टाकावयाचें नाहींच असा मंडळीनें केला निश्चय. आणि लोकांच्या बोलण्यासंबंधानें बधिरता स्वीकारली व जवळून पैसा खर्च करण्यास आरंभ केला. जो जो काम शेवटास येत चाललें तों मंडळीस अधिकाधिक वाईट वाटण्याचा संभव दिसूं लागला. घरीं बसून पैशाचा हिशेब बरोबर दिसत नाहीं. जास्त पैसा संस्थानें मंजुरात नाहीं वगैरे नाना प्रकारचे सिद्धांत बाहेर पडूं लागले, परंतु सभा भरविली कीं त्या दिवशीं मात्र यावयाचें नाहीं. लायब्ररीच्या विपरीत कालाचा येथेच्छ उपयोग त्यांनीं करून घेतला याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे! इमारतीचें काम पुरें होत आलें. प्रवेश समारंभा संबंधानें लोकांच्या टोंचून कोल्या सुरू झाल्या. आमची कांहीं मित्र मंडळी या इमारती संबंधानें फार वेगळ्या रीतीनें वागत होती. स्पष्टपणें विरुद्ध तर बोलावयाचें नाहीं पण कोणत्याही प्रकारें अनुकूलताही दाखवावयाची नाहीं. कित्येकांचे मतानें ही रिकामटेकडी होतीच. आतांशीं मात्र मंडळी मधून मधून येऊन इमारत पवित्र करूं लागली होती. बोलण्या संबंधानेंही थोडे मागेंच पाऊल होते. आणि अखेरीस प्रवेश समारंभ मे० मेकंझी साहेब बहादूर यांच्या हातून तारीख २६ फेब्रुवारी मंगळवारीं होण्याचा संकल्प ठरला. सर्वत्र आनंदोत्सवाची धांदल उडाली!

अशा रीतीनें सर्व नागरीक लोकांस आनंदाचा, संकटें सोसलेल्या मंडळीस कृतकृत्यतेचा, इतिहासकार व ग्रंथकार यांस सोन्याचा व साहेब बहादूरांचे परिचित मंडळीस महोत्सवाचा असा मंगळवारचा दिवस उगवला. शोभायमान आसमंत भागाची वनश्री, विजयपताका, कर्दळीस्तंभ, हांड्या झुंबरें, गालिचे, सतरंज्या, पुष्पगुच्छ इत्यादिकांनीं लायब्ररीच्या इमारतीचा देखावा सुंदर, मनोहर व रमणीय होता. अशा त्या रम्यस्थळीं पांच हजारावर लोक एकत्र जमून आनंदोद्गारांनीं आकाश दुमदुमून गेलें होतें. पर्जन्य पडतो कीं काय असें वाटे पण आगंतुक विघ्नें लयास गेलीं आणि त्या रम्य सरस्वती मंदिरांत कर्नल मेकंझी येऊन आसनस्थ होतांच रा. रा. खुशाल नारायण पांगरकर बी. ए. यांनीं एक सुरस निबंध वाचला. यांत संस्थेची इत्थंभूत माहिती दिली असून इमारतीस ३२०० रुपये लागले व वर्गणीचे आंकडे कमेटी सुद्धां २७०० रुपयांचे होते. पैकीं येणें वसूल ४३९ रुपये व एकूण संस्थेवर रा. रा. व्यंकटराव देशमुख व रा. रा. नरहरराव देशपांडे यांचे हिशेब तयार असल्या तारखेपर्यंतचे ६०० रुपये कर्ज झालें आहे यांचा खुलासा केला होता व या दोन गृहस्थांचा दीर्घ प्रयत्न, अश्रांत श्रम सार्वजनिक कामाची कळकळ यांचे पूर्णपणें दिग्दर्शन केलें होतें. साहेब बहादुरांचे आगमनापासून झालेल्या आनंदाचें चित्र जनांचे हृत्पटलावर उमटलें होतें. त्याचेंच भाषांतर उर्दूत मे० कमरुद्दीन यांनीं वाचलें. नंतर कमिशनर साहेबांनीं थोड्यांच भाषणांत आपल्यास झालेला आनंद प्रदर्शित केला. व सदरील दोन गृहस्थांच्या श्रमाबद्दल व द्रव्यद्वारा मदती बद्दल फार तारीफ केली. व ज्या गांवीं मी फार दिवस काम केलें त्याच ठिकाणीं असा आदरसत्कार झालेला पाहून मला फार आनंद वाटतो असें बोलून टाळ्यांच्या गजरांत स्वारी खालीं बसली. नंतर मे. सय्यद अमजत हुसेन खतीब साहेब स्पे. मा. यांनीं साहेब बहादुरास लायब्ररी उघडण्या विषयीं विनंती केली. साहेब बहादुरांनीं इमारतीचे उत्तरे कडील दार उघडून प्रमुख प्रमुख मंडळीसह आंत शिरले. इमारतींत तिन्ही हालांत नव्या सतरंज्यांची बिछाईत केली असून प्रत्येक हॉलाच्या मध्यभागीं एक एक गालिचा आंथरला होता. व त्यावर लहान वर्तुळाकार टेबलावर मौल्यवान आच्छादन टाकून वर प्याल्यांतून पुष्पगुच्छ ठेविले होते. वर मोठाले हॅंगिंग लॅम्प लाविले होते. मधल्या हॉलांत उत्तराभिमुख दोन कांचेच्या अलमाऱ्या बुकांनीं भरलेल्या ठेविल्या होत्या. इमारतीस आतून नुकतांच दिलेला रंग, दारानां लाविलेलें झळकत असलेलें वारानिश, वर शुभ्र छत व त्यांतून दार उघडल्या बरोबर आंतील उजेडाचा एकदम डोळ्यांस दीपविणारा दाटलेला प्रकाश यांहीं करून तर इमारतीस अती रमणीयता आली होती. व ती शोभा पाहिल्या बरोबर मन गारेगार होऊन गेलें. साहेब बहादुरांसही आनंद झालेला दिसला. इमारतीची शोभा पाहून साहेब पुन्हां मंडपांत आले. नंतर एका आमच्या मुसलमान गृहस्थानें फारशींत रचलेल्या कविता वांचल्या. शेवटी रा. रा. विनायकराव महाजन यांनीं आलेल्या मंडळीचे आभार मानून आपली दयालु राणी व्हिक्टोरिया व जनाब कर्नल मेकंझी सी. आय. इ. कमिशनर यांचा त्रिवार जयघोष करण्यास विनंती केली. व त्या प्रमाणें सर्व मंडळीनें उभे राहून आनंदानें त्रिवार जयघोष केला. नंतर साहेब बहादुरांस हार घालून अत्तर विडे दिले व तदनंतर सर्व मंडळीस हार वगैरे दिल्यावर साहेब बहादूर जनाब डे० कमिशनर, मे. मानिकशा प्रभृति मंडळीसह आपल्या परिचिता पैकीं मोठाल्या मंडळीची भेट घेत व सुखाच्या गोष्टी विचारीत विचारीत व दोहों बाजूंनीं होत असलेल्या पुष्पवृष्टीचा हास्य मुद्रेनें स्वीकार करीत करीत आपल्या गाडी जवळ आले व सर्व मंडळीचा निरोप घेऊन चालते झाले.

पत्रकर्ते महाराज, या प्रमाणें तयार झालेली इमारत साहेब बहादुरांचे हातून सर्व शहरवासी लोकांचे पदरांत घातली गेली.

॥ सुचिंत्य चोक्तं सुविचार्य यत्कृतम् ॥
॥ सुदीर्घ कालेऽपि न याति विक्रियाम् ॥

आतां सविनय प्रार्थना ह्मणून इतकीच आहे कीं या संस्थेस उत्तम रीतीनें चालविण्या विषयीं सर्व लोकांनीं कळकळीनें झटून आपला उद्धार कर पुढें करावा ह्मणजे आपलें व आपल्या वंशजांचें कल्याण होईल.

४।३।९५ प्र०

---


कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.


---

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य १४ शके १८१६

विवाहित स्त्रीपुरुषांचे परस्परांवर कांहीं विशिष्ट हक्क असतात आणि ते हक्क अबाधित व अव्याहत चालावे ह्मणून दिवाणी कायद्यानें कांहीं योजना केल्या आहेत. लग्नसंबंधी हक्कांचा हुकुमनामा मिळवितां येतो आणि त्याच्या अंमलबजावणीस जर कोणी विवाहित स्त्री किंवा पुरुष इनकार करील तर दिवाणी कैदेची शिक्षा देण्याचा कोडतास हुकूम आहे. ही कैदेची शिक्षा काढून टाकावी अशा विषयीं आज कित्येक वर्षें राष्ट्रीय सामाजिक सभा आपल्या ठरावानें सरकारास विनंती करीत आहे आणि या विनंती प्रमाणें व्हाइसरायाच्या कायदे कौंसिलांत एक सूचना आली होती पण अद्याप सर्व देशाची स्थिती परिपक्व दशेला आली नाहीं या कारणा वर ती सूचना वगळण्यांत आली. तदनंतर नामदार फेरोजशहा मेथा यांनीं एक फार उपयुक्त उपसूचना आणिली होती ती अशी कीं विवाहहक्कांची बजावणी इष्ट व सकारण वाटल्यास कोडतानें तुरुंगवासाच्या शिक्षेनें होऊं देऊं नये. ही उपसूचना अखेर नामंजूर झाली पण तिच्या समर्थनाच्या वेळीं मोठा वादविवाद झाला आणि त्यांत असेंही निघालें कीं सांप्रतच्या कायद्यानें बायकांचा छळ करण्यास पुरुषांच्या हातीं एक शस्त्र दिलें आहे तें हिसकाऊन घेण्याचा उपसूचनेचा स्तुत्य उद्योग होता. परंतु या वर असे प्रत्यवाय दाखविण्यांत आले कीं असा फरक केल्यानें देशभर चळवळ होईल व राज्यकर्त्यांस लोकमताला संभाळून वागलें पाहिजे आणि तसेंच आपापले विवाहाचे हक्क कायम राखण्यासाठीं व संसार सुखावह करण्यासाठीं बायकांस पतिव्रता बनविण्यास जी मदत कायद्यानें समाजांतील कनिष्ट दर्ज्याच्या लोकांस दिली आहे ती अद्याप पुष्कळ अशीं पाहिजे आहे. या दोन कारणावरून उपसूचना रद्द झाली पण देशभर चळवळ होईल या कारणाचा विचार सर आंड्र्यू स्कोबल यांच्या संमती वयाच्या बिलाच्या वेळीं कोठें अस्तास गेला होता? त्या वेळीं सरकारनें लोकमताची पायमल्ली केली नाहीं काय! असो. असले सूक्ष्म विचार सरकारच्या ध्यानांत भलत्या दिशेनें चांगल्या उपसूचनेच्या प्रतिरोध करण्यासाठीं बाहेर पडले याचें नवल वाटतें. कैदेची शिक्षा विवाहित दंपत्याला विवाहाच्या हक्का निमित्त विकल्पें न देण्याचा अधिकार दिवाणी कोडतास दिला असतां तर कनिष्ट लोकांस कायद्याची मदत मिळून वरिष्ठ वर्गांतील स्त्रियांचे नैसर्गिक हक्कांचा योग्य मान राहिला असता. राष्ट्रीय सामाजिक सभेच्या ठरावाला पुन्हा कायदे कौंसिलांत यथाकाल स्थळ मिळे पर्यंत आपण खानगी रितीनें इष्ट सुधारणा करून घेत गेलें पाहिजे.

---

'वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थि समाज' चा नववा वार्षिक समारंभ खामगांवास मोठ्या आनंदोत्सवांत निर्विघ्नपणें पार पडला. या समाजापासून हायस्कुलांत शिकलेल्या जुन्या मंडळीच्या भेटी होतात, परिचय नवेजुने होऊन दळणवळण वाढतें, आणि हीच समासद मंडळी प्रांतिक लोकसमूहाचे आशावृक्ष व भावी पिढ्यांचे आधारस्तंभ असल्यामुळें त्यांच्या एकत्र जमण्यापासून सर्व प्रांतभर एका प्रकारची उत्तम चळवळ होण्याचा संभव आहे. या समाजाचें महत्व विचार दृष्ट्या अत्यंत आहे पण समाजाच्या कार्याची व्याप्ति अगदीं परिमित असल्यामुळें कोणत्याच महत्कार्याला अद्याप चांगलासा प्रारंभ नाहीं. राजकीय किंवा सामाजिक चळवळीचें स्वरूप अजून समाजाच्या कार्यमालेंत दिसून येत नाहीं. गेल्या नऊ वर्षांत विशेष सौम्य व साध्या प्रकरणांत समाजाचें अंग आहे. दोन दिवस एकत्र जमावें, हंसावें, खेळावें, मौज करावी वगैरे सारख्या आनंदकारक व प्रेमवर्धक गोष्टींत सभासद आपापली आवडती करमणूक करून घेत आले. या समाजाच्या वार्षिक समारंभानें शिमग्याचा अर्थबोध दिवाळीच्या सणा सारखा निराळ्या प्रकारें होऊं लागला आणि ही सुधारणा फार दृढ होत जाऊन शिमग्याचा बीभत्स प्रकार वऱ्हाडांत लवकर लयास जाईल असा रंग दिसतो. या समाजाच्या अंगीं उत्तरोत्तर जबाबदारीचीं कार्यें पत्करण्याची शक्ति येत आहे त्या मानानें सभासद मंडळी मोठ्या उल्हास वृत्तीनें पुढें सरसावतील व कांहीं विवक्षित मार्गांनीं आपल्या राजकीय व सामाजिक उन्नतीचा दरवाजा सुगम व सोप्या युक्तींनीं खुला करितील अशी आशी उमेद वाळगतों.

खामगांवास गेला समारंभ अपूर्व होता. अदमासें दोनशे अडीचशेवर बाहेरून लोक आले होते. जमलेल्या मंडळीचें स्वागत व पाहुणचार हीं राजगृहांतल्या थाटा प्रमाणें झालीं जुन्या शाळेची सुशोभित इमारत, स्वागतपर कमानी, प्रशस्त मंडप, त्यांतच नाटकाची रंगभूमी, इंग्रजी व मराठी चाळीच्या बिछायती, गाडी घोड्यांचें वाहनवैपुल्य मेजवान्यांची गर्दी, व तलावा वरील उपहार इत्यादिकांनीं व्यवस्थापकांची टापटीप, बातबेत, व योजनाशक्ति हीं उत्कृष्ट प्रकारें व्यक्त झाल्या. खामगांवचा समारंभ मागील वर्षापेक्षां अधिक चांगला झाला हें व्यवस्थापक मंडळीस आणि मुख्यत्वें करून रा. रा. विठ्ठल सदाशिव करकरे, नायब तहशीलदार व त्यांची साथीदार मंडळी यांस अत्यंत भूषणावह आहे आणि त्यांच्या या थोर कर्तबगारीबद्दल समाजाची मंडळी अत्यंत ऋणी आहेत.

यंदाच्या समारंभामध्यें चांगला खल होऊन वादविवादा अंतीं बहुमतानें जे उपयुक्त ठराव करण्यांत आले त्यांचा मतलब खालीं लिहिल्या प्रमाणें आहे:— (१) सरकारी नोकरींत सुशिक्षित लोकांचा प्रवेश होईल असे नियम मुंबई इलाख्या प्रमाणें करण्यांत यावे व वऱ्हाडांत वास्तव्य करणाऱ्यांस चाकरी संबंधानें पहिला हक्क द्यावा. (२) शिक्षणाकडे प्रांतिक उत्पन्नांतून अधिक पैसा खर्ची पडावा, (३) वऱ्हाडच्या एल. एल. बी गृहस्थांस इकडे कायमची वकिली करण्यास तीन वर्षांचा प्रत्यवाय नसावा; [४] हायस्कुलांत शिकणाऱ्यास लागूं केलेली वयाची इयत्ता रद्द व्हावी; [५] आंग्लो-व्हरनाक्युलर शाळेच्या विद्यार्थ्यानें ज्या इयत्तेंत शाळा सोडली असेल ती इयत्ता शाळा सोडते वेळीं हायस्कुलांत चालत असल्यास तो विद्यार्थी समाजाचा सभासद होऊं शकेल; (६) ज्या विद्यार्थ्यांनीं स्कालरशिपा उपभोगिल्या असतील त्यांनीं त्या यथाशक्ति हप्त्याहप्त्यांनीं परत कराव्या आणि अशा जमलेल्या रकमेंतून वेळोवेळ योग्य विद्यार्थ्यांस मदत करावी. (७) पुढील वर्षाचा दहावा

समारंभ अकोलेकर मंडळींना आकोल्यास किंवा इतर ठिकाणीं करावा (८) पुढील वर्षीकरितां रा. रा. गोपाळ वामन बापट बी. ए. एल. एल. बी. आणि बळीराम मेघश्याम पिंपळे यांस जनरल सेक्रेटरी निवडण्यांत आलें.

यंदा नाटकप्रयोगामुळें समारंभाच्या कार्यपत्रिकेला विलक्षण वैचित्र्य आलें होतें आणि त्या मुळें मंडळीची गर्दीहि मोठा होती. रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी, पद्मनाभ राघोजी दंडे, दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर, पेंडसे, पुरोहित, आदिकरून गृहस्थांनीं मित्रमंडळीच्या मनोरंजना साठीं गुणोत्कर्ष नाटकाचा प्रयोग गेल्या १० वे तारखेस रात्रौ करून दाखविला. प्रयोग फार नामी झाला. स्वल्प वेळांत इतकें उत्तम नाटक हे होईल असें आह्मास वाटलें नव्हतें. या वर्षीं करमणुकीचा हा एक निराळाच मार्ग निघाला, आणि चांगली थोर थोर विद्वान मंडळी त्यांत असल्या कारणानें प्रयोग फार उत्कृष्ठ वठला आणि सर्वजणांनीं वरील गृहस्थांची फार वाहवा केली. जीवाजीपंत, गणपतराव किल्लेदार, शिवाजी महाराज, संभाजी, राधा इत्यादि पात्रांचीं कामें विशेष वर्णनीय झालीं. जीवाजीपंत व शिवाजी या उभयतांचीं कामें अगदीं स्वाभाविक, रसभरीत व हृदयंगम वटलीं. वरील गृहस्थांचें नाट्यकौशल्य पाहून सर्वजणांस बहुत नवल वाटलें.

---

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. माजी डायरेक्टर साहेब हे मुंबईच्या कायदे कौंसिलांत सभासद होण्यासाठीं मध्य भागा तर्फे उमेदवार आहेत आणि पुण्याकडील वर्तमानपत्र कर्त्यांनीं राव बहादुरांस निवडण्यासाठीं मत देणाऱ्यांस सल्ला दिला आहे हें वांचून बहुत संतोष वाटतो. विद्वान सर्वत्र पूज्य व मान्य असतातच आणि तशांत राव बहादुर जठार सारखे शांत, दूरदर्शी, मित भाषणी, व राजमान्य पेनशनर अधिकारी लोकसेवेला पुढें सरसावले तेव्हां लोक वृंद आपल्या मतप्रदर्शनानें त्यांचा गौरव व अत्यादर करितील हें निराळें कळविण्याची गरज नाहीं. राव बहादूर कौंसिलदार होऊं इच्छितात हें ऐकून वऱ्हाडच्या मंडळीस आनंद होईल. ईश्वर करो आणि राव बहादुरास दीर्घायुष्य, आरोग्य, व सुख बहुत लाभो!

---

राव साहेब देवराव विनायक व्हाइस चेअरमन अकोला मुनसिपालिटी यांनीं आपल्या या लोकदत्त अधिकाराचा राजिनामा दिल्याचें ऐकून वाईट वाटलें. राजश्री बाबा साहेब यांनीं मुनसिपालिटीद्वारा लोकसेवा सर्वोत्कृष्ठ केली आहे आणि त्याबद्दल आह्मी त्यांचे अत्यंत उपकार मानतों. त्यांच्या सारखे पाणीदार, वजनदार व धुरंधर सद्गृहस्थ मुनसिपालिटीचे मुख्य अधिकारी अवश्य पाहिजेत किंबहुना त्यांच्या हातून बहुत कामें झालीं नाहींत तरी मार्गदर्शकत्व त्यांच्या हातीं असणें आह्मांस फार इष्ट वाटतें. लोकांच्या विनंतीला ते मान देऊन आपला आग्रह सोडतील अशी आह्मी इच्छा करितों. रावबहादूर जठार यांचो लोकसेवेंतली तत्परता लक्षांत घेऊन रावसाहेब आपला विचार कदाचित फिरवितील तर बरें!

---

# The Berar Samachar

MONDAY MARCH, 25, 1895

## LEADERS OF MASSES NO. III

(Communicated)

The enquiry into the natures and conditions of successful leadership becomes imperative when our survey of ourselves is saddened by the absence of any grand movement in national history. Credited as we are with being the first civilized nation on earth, our history has been from remote antiquity one monotonous blank. There have been no revolutions, no popular up heavals, no national enthusiasm. The national heart never throbbed with one universal aspiration. During three thousand years, in which many nations have risen from almost nothing, worked out their destinies, have either fallen to rise again or thrive with a perfectly developed national existence, we have stopped in our march, and returned almost to the inanity of the first condition of the human race and like spoilt and indolent children feed upon the welnigh exhausted treasures of our remote ancestors. There has been no Napoleon, no Darwin, no Tynesson, no Lessops. There have been no grand facts like the reformation or the revolution no death of Charles, no Louis, nc triumphs, no defiant Ireland in our history. Shivaji & the Maharattas were a short glimmer, like to which Europe presents a dozen movements during a century. Patriotic feeling is certainly selfish and that may clothe him and them and their descendants with that degree of divinity which palls into insignificance in a comparison with the momentous history which has come into our observation. To confess the truth, our national life does not present an imposing spectacle to my imagination nor does it assert itself to my senses with its huge, irresistible presence either for good and evil. Does the nanation show during a long period of its existence one steady, continuous, development of one single, valuable institution, through sun shine and shadow, victory and disaster, triumph and defeat, sustained by the energy of a whole nation; inspired by the emotion of a national enthusiasm? Has its existence been so evolved as to transmit to future generations progressive impulses and to make them reflex in their movements? What can we boast of? Is it our military glory? It extends to the triumph of Kharda and disaster of Panipat. Is it political existence? It embraces a confederacy of court favourites raised to power, ready to fling themselves on the benefactor, an eastern despotism, with its horrors and barbarities, woven intreagues and universal mismanagement. Is it science that we can boast of? The eclipse and the cholera are still the demons that we like to propitiate with almsgiving and worship into silence. Is it engineering? Until the last century every stream was unbridged, every province ill-provided with roads and channels of communication. Is it religion, and alas we have returned to a condition gross in its attitude unimposing in its aspect and unelevating in its influence from a comparatively pure creed? If it is poetry and literature, they too present the same common-place life and dwarf stature. What new idea has it breathed what new impulse has it given to us, what new truth unknown before has it presented to the ungrudging acceptance of mankind? What enthusiasm has it kindled into the national breast? Will not your sober sense, your genuine patriotism, admit this, endorse these statements with candour, when I tell you remote antiquity say from the time when our ancestors many degrees removed we have not spoken one language, professed one creed and vast tracts and provinces have not exchanged one word, much less was there any identity of feeling one heart breathing in the land or hands raised in one universal cooperation in an hour of one enthusiasm or the working out of one propaganda. In such a land and of such a people leadership is an extremely difficult problem. A genius will be unable to solve it. And yet the present is so solemn and favourable that an attempt to solve it must be made.

---

## वऱ्हाड

हवामान— मध्यंतरी दोन चार वेळ पाऊस पुष्कळ पडला आणि त्या मुळें उष्णतेचें मान कमी झालें आहे. हवा चांगलीशी नाहीं. व रोगराईही ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि. हैदर अली अब्बाची अकोला यांची बदली यवतमाळास झाली. हे गृहस्थ हुशार वाकबगार, व कार्यदक्ष असून त्यांस असिस्टंट कमिशनरच्या दर्जांत बढती मिळत नाहीं आणि नवे नवे लोक बाहेरून असि० कमिशनर ह्मणून येतात हें वऱ्हाडच्या राज्यकारभाराला कांहीं भूषण नाहीं असें नित्यांतल्या अनुभवा वरून कळून येईल. दांडगाईनें यांची बढती बुडविली आहे.

रा. रा. गोविंदराज अय्या साहेब यांची बदली येथील स्माल काज कोर्टांतून वाशिमास सिव्हिल जजचे जागीं झाली. वऱ्हाड प्रांतांत यांच्या इतक्या जुन्या चाकरीचे आफिसर विरळा आढळतील. अकोल्यास बदली होऊन स्थीर स्थावर होत आहेत इतक्यांतच वाशिमास बदलल्यानें अय्या साहेबांस दगदग विशेष झाली व त्यांच्या मित्रमंडळीचा विरस झाला.

रा. रा. जी. सुब्रायलू नायडू तहशिलदार, अकोट यांस यवतमाळास एक्स्ट्रा अ. कमिशनरचे जागीं बढतीवर नेमिलें हें कळविण्यास संतोष वाटतो. योग्य जागीं योग्य मनुष्य.

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशिलदार मोर्शी यांस अकोटच्या तहशिलीवर बदललें.

आणि रा. रा. मारुती मोहनराय कमिशनरचे कचेरींतील क्लार्क यांस मोर्शीस तहशिलदार नेमल्याचें कळतें. मे मेकंझी साहेबांच्या कृपादृष्टीचें हें फळ होय.

कुमार श्री हरबाजी असिस्टंट कामिशनर, यवतमाळ यांची बुलढाण्यास बदली झाली आहे. परंतु भरतपूरच्या संस्थानांत यांस दिवाणगिरी मिळाल्यावरून ते तिकडे लवकरच जाणार आहेत.

येत्या एप्रील पासून कारंज्यास मुनसिपालिटी स्थापित होईल आणि तिच्या सभासदांची नेमणूक सरकार मार्फत होत जाईल. ही संस्था बारा सभासदांची केली असून मूर्तिजापूरचे तहशिलदार रा. रा. रघुपत मोहनराव हे अध्यक्ष आहेत. सभासद गृहस्थ चांगले संभावित, श्रीमान, व सार्वजनिक कार्यांत तत्पर असे आहेत तेव्हां ही स्थानिक संस्था उत्तम चालून लोक सुखी होतील अशी आह्मास उमेद आहे.

क्याप्टन ओ. जी. आयव्हर्स असिस्टंट कामिशनर, अकोला यांस गेल्या पंधरावे तारखे पासून ९० दिवसांची रजा मिळाली

चालूं साला करितां पहिल्या वर्गांत २० व दुसऱ्या वर्गांत ९८ वकिलांस या प्रांतीं वकिली करण्या करितां सनदा देण्यांत आल्या आहेत.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर हे एक महिन्याच्या रजेवर काशी यात्रेला गेले आहेत.

आणि त्या रजेंत रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांस आफिशिएटींग डायरेक्टर नेमिलें आहे. प्रसादचिन्हानि पुरःफलानि या न्यायानें हा योग यथाकाल फलप्रद होईलच.

पंडित सुरज नारायण असि. कमिशनर यांची बडनेऱ्यास बदली झाली.

रा. रा. रामचंद्र अबाजी पन्हाळकर फर्स्ट असिस्टंट हायस्कूल, उमरावती यांची बदली जळगांवच्या इंग्रजी मराठी शाळेवर करून तेथील हेड मास्तर रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे यांस अकोटच्या शाळेवर रा. रा. कृष्णाजी सदाशिव तांबे यांच्या सहा महिन्याच्या रजेत नेमिलें आहे.

मंगरूळपीरच्या लोकांस गवता निमित्त फारेस्ट नाक्यावर विनाकारण कर द्यावा लागत असे तो तिकडील फॉरेस्ट आफिसरांनीं बंद केला. जंगल खात्याचा जुलूम दूर करणें हें पुष्कळ अंशीं जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांच्या हातीं आहे.

रावबहादूर बामन नारायण बापट एक्स्ट्रा असि. कमि. व रा. रा. अंबादास संतो एक्स्ट्रा असि. कमि. हे उभयतां मार्च अखेर पेनशन घेणार आहेत.

खान बहादूर सादत मीरखा तहशिलदार पुसद हे चालू महिन्याच्या अखेरीस पेनशन घेणार आहेत.

रा. रा. बर्वे, हेडमास्तर, यवतमाळ यास ९० रुपयाचे ४० रुपये पगार करून यवतमाळासच फर्स्ट असि. मास्तर नेमिलें. हें वाईट झालें. डायरेक्टर साहेबांस यांचा कोणता मोठा अपराध वाटला न कळे!

यवतमाळचे हेडमास्तरचे जागीं रा. रा. वामन प्रभाकर परांजपे यांस चिखलीहून बदलून चिखलीस रा. रा. सितारामपंत चितळे यांस उमरावती हायस्कुलांतून पाठविलें व अखेरचे जागीं रा. रा. अंबेकर यांस यवतमाळाहून बदललें.

मि. मीर आलम, डेपुटी क्लार्क, सेशन कोर्ट यांस रेसिडेन्सी आफिसांत मुनशीचे १५० रु० पगाराची जागा मिळून डेपुटी क्लार्कचे जागीं रा. रा. बळवंत यादव खोलकुटे बी. ए. यास नेमिलें असें कळतें.

रा. रा. गणेश अनंत वैद्य, हेड क्लार्क, डायरेक्टर कचेरी, हे पुढील महिन्या पासून दोन महिन्याच्या हक्काच्या रजेवर जात आहेत.

---

## वर्तमानसार.

मार्थे बिघडून कत्तल— कुंभकोण (मद्रास) तालुक्यांतील मुदूरातिरामारादूर गांवचा रहाणारा एक माणूस ब्रह्मदेशात पलटणांत चाकर होता तो रजा घेऊन आपल्या गांवीं आला त्याची बायको अमक्या अमक्या मनुष्याशीं व्यभिचार करिते असें त्यास कोणी सांगितलें त्या वरून त्याचें माथें फिरलें, आणि रात्रीं हातांत एक मोठा सुरा घेऊन तो घराबाहेर पडला. शेवट त्यास पकडून कैद करी पर्यंत त्यानें बायको आणि पुरुषांचे मिळून नऊ खून केले.

अफगाणीस्थानच्या अमीरानें आपल्या कारितां २२ हत्ती ६०००० रु० खरेदी केले. ते काबूलास आणण्या साठीं पेशावरास जाऊन पोहंचले आहेत.

अंबरच्या खाणी— अंबर ह्मणून एक सुवासिक पदार्थ असतो हें पुष्कळांस माहीत असेल. ह्याच्या खाणी बाल्टिक समुद्राच्या उत्तर किनाऱ्यावर अन्ना पामानिलान ह्या ठिकाणीं आहेत. हा खाणींतून काढला असतां अशुद्ध स्थितींत असतो, तो कृत्रीम उपायांनीं व साधनानीं शुद्ध करावा लागतो. ह्या खाणींत काम करणारे एकंदर दोन हजार मजूर आहेत. जगांत अंबराचा जितका खप होतो त्याचा ९/१० ह्या खाणींतून निघतो असें ह्मणतात. मृत्तिकेशीं मिश्रण झालेला हा कांहीं झाडांचा चीक असावा असें शास्त्रज्ञांचें मत आहेत.

बीट साखरेचें उत्पन्न— बीट ह्मणून एक वनस्पति आहे तिच्या पासून साखर करितात. ही साखर गोडीला पुष्कळ कमी असते. युरोप, अमेरिका ह्या मध्यें ऊस होत नाहीं ह्मणून तिकडील कारखानदार ह्याच वनस्पतिची लागवड करून तिच्यापासून साखर तयार करितात गेल्या सालीं बेलजम, जर्मनी, फ्रान्स, हालंड, आस्ट्रिया, हंगारी आणि रशिया ह्या एकंदर देशांत मिळून ३६ लक्ष ८७ हजार टन बीटची साखर तयार झाली. असें समजतें. शु० सू०

शक्तीपेक्षां फाजील व्यायाम व कसरत करण्यानें फायद्यापेक्षां नुकसानी फार होते. असें अनेक व्यायामकुशल व शारीरशास्त्रज्ञांनीं अनुभव पूर्वक प्रसिद्ध केलें आहे. आमच्या कडील तालीमबाज शोकी मंडळी ह्या गोष्टीकडे अवश्य लक्ष देईल तर बरें होईल. फाजील व्यायामानें मस्तकांत रक्त जाऊन आकस्मिक मृत्यु आल्याचीं अनेक उदाहरणें आहेत.

हल्लीं वकीली व मुनसफी या परीक्षांना उमेदवार फार येतात सबब या परीक्षा दर तीन वर्षांनीं घेण्याचें करावें अथवा पी. इ. ची परीक्षा पास झालेल्यांनांच मात्र या परीक्षेला बसूं द्यावें, असें लवकरच ठरावयाचें आहे ह्मणून ह्मणतात.

बडोदा येथें एक मोठा उंच मनोरा बांधण्या कारितां गाईकवाड सरकारांनीं ९२,४३३ रुपये खर्च करण्याची मंजुरी दिल्याचें समजतें.

फर्ग्युसन कॉलेजाच्या नवीन इमारतीचा गृहप्रवेश येत्या हिंदु वर्षप्रतिपदेच्या दिवशीं नेक नामदार लॉर्ड सॅन्डहर्स्ट यांच्या हस्तें व्हावयाचा आहे, त्या वेळीं डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. शाहू छत्रपती महाराज हे अध्यक्षस्थानीं विराजमान व्हावयाचे आहेत. दी. बं.

जपानच्या शहाच्या मनांत आपल्या चिरंजिवाचें लग्न अमेरिकन अथवा यूरोपियन वधूशीं करावयाचें आहे.

झार साहेब इन्फ्लुएंझानें आजारी असल्याचें समजतें.

लंडन शहरांत हल्लीं इन्फ्लुएंझा तापानें फारच कहर करून सोडला आहे. गेल्या आठवड्यांत त्या शहरांत फक्त पाच आजारानें चवदाशें मनुष्यें मेलीं.

तारेचे दर सरकार लौकरच कमी करील असें मुंबईच्या चेंबर आफ कामर्स सभेनें आपल्या वार्षिक रिपोर्टांत लिहिलें आहे. पण अद्येर नन्नाचा जबाब मिळाला.

चित्रळ शहरावर अमराखान चाल करीत येत असून लौकरच लढाई होईल असा रंग दिसत आहे.

रशिया व इंग्रज यांच्यांत स्नेहसंबंध वाढविण्या साठींच काबूलचा अमीर विलायतेस जाणार आहे असें ह्मणतात. न्या. सु.

धारवाड जिल्ह्यांत अळणावर येथें एक सोन्याची खाण सांपडली आहे.

फ्रान्समध्यें कृत्रिम कापूस तयार होऊं लागला असून तो सृष्टिजन्य कापसा पेक्षां स्वस्थ पडतो व त्याचा कपडाही चांगला बनतो हा कापूस कांहीं वृक्षांच्या तंतूपासून रसायन प्रयोगानें तयार करितात.

मध्यप्रांतांतील सागर जिल्ह्यांत यंदाही पिंका बहुतेक तुडारपामुळें तिकडे पुन्हां दुष्काळ पडतो कीं काय अशी भीती वाटूं लागली आहे.

इन्फ्लुएन्झा तापाच्या सांथामुळें मुंबई येथील ट्रामवे कंपनीचे सुमारें शंभर घोडे आजारी पडले आहेत. यासाठीं रिपन रोड वरील ट्राम गाड्या चालणार नाहींत, असें प्रसिद्ध झालें आहे. क० त०

## विलक्षण घड्याळ

हें फ्रान्समधील नॉर्दर्न रलवेकंपनीचे इजिनिअर बोव्हे एम्. व्हेरिटे यांनीं तयार करून बोव्हे येथील देवळाला नजर केलें आहे. घड्याळ ह्मणजे यंत्रशास्त्रकुशलतेचें प्रदर्शनच आहे. त्यावर ९२ तक्तें आहेत. त्यावर सेकंद, मिनिटें, तास, दिवस, आठवडा, महिना, सन, सूर्योदय व सूर्यास्त, चंद्राच्या कला, भरती ओहोटी, जगांतील मुख्य मुख्य शहरांतील वेळा, आणि भूगोलावरील व खगोलावरील बरेच चमत्कार दृष्टीस पडतात. त्या घड्याळांत ९२,००० चक्रें वगैरे आहेत. या सर्व चक्रांना ५० ग्रेन वजनाच्या आंदोलकाच्या योगानें गति मिळते. तासाचा ठोका पडला कीं, सर्व यंत्रांना विलक्षण गति मिळून जिकडे तिकडे हालचाल होते. अखेरचा जो न्यायाचा दिवस त्याचीही नक्कल त्यांत दिसते. कोंबडा आरडतो. चार दिशांना देवदूत तुताऱ्या वाजवितात, व उजव्या व डाव्या बाजूला असलेल्या मनोऱ्याच्या भोंकांतून ज्वाळा बाहेर पडूं लागतात. जगाचा पिता जगाचा न्याय करण्याकरितां चोंहोंकडे टेहळतो आहे असें दिसतें. इतक्यांत एक आत्मा पुढें येऊन त्या जगन्न्यायाधिशापुढे उभा रहातो. हा आत्मा पापी मनुष्याचा असतो. त्याला शिक्षा सांगितली जाते, त्या बरोबर एक भयंकर यमदूत हातांत दंड घेऊन येतो व त्या पापी आत्म्याला गचांडी देऊन त्याला खोल दरींत (नरकांत) ढकलून देतो. नतर एक पुण्यवान मनुष्याचा आत्मा पुढें येऊन उभा राहतो. त्याचा सन्मान होऊन त्यास स्वर्गसुख प्राप्त होतें इतक्यांत देवदूत येऊन रांगेनें दोहों बाजूला उभे राहून त्याला मोठ्या थाटानें वरच्या मजल्यावरील वाड्यांत घेऊन जातात व मधुर गायन सुरू होतें. क०

हिंदुस्थान सरकारानें नुकतांच जो जकातीचा अक्ट केला त्यांतील नियमा प्रमाणें आमच्या इंजनेरी धंद्यास धोका आहे अशाबद्दल तकरार करण्यास मुंबईचे कांहीं इंजनेर विलायतेस गेले आहेत असें सांगतात.

पाटणाचे सरकारी वकील मि. कादर बक्ष यांस निझाम सरकारानें आपल्या हायकोर्टाचे चीफ जस्टिस नेमलें.

रशियाचें एक वकील मंडळ अबिसिनी याच्या राजाकडे जात आहे. अबिसिनीयाचेंही एक वकीलमंडळ रशियन बादशहाशीं स्नेह जोडण्याकरतां रशियाकडे जात आहे.

अफगाणिस्थान व पर्शिया यांची सरहद्द कायम करण्याचें काम लवकरच सुरूं होणार आहे.

तुह्मी १ एप्रिलच्या आंत चित्रळ सोडून जा व त्या प्रमाणें न जाल तर सरकार तुह्मास सक्तीनें घालऊन देईल असें चित्रळ येथें असलेल्या उमराखानास इंग्रजसरकाराकडून लिहून जात आहे व वेळ पडल्यास उपयोगीं पडण्याकरतां फौजेची तयारी चालली आहे.

जपानी फौजेच्या पहिल्या तुकडीच्या कांहीं लोकांनीं पिको हें ठिकाण घेतलें व तेथील चिनी लोक टिंवंग येथें पळून गेले.

तहाचें बोलणें करण्याकरतां लिहुंगचंग यांस इतक्यांत न पाठविता आणखी एका आठवड्या नंतर पाठवा असें जपानानें चीनास कळविलें आहे.

यिंकोच्या किनाऱ्यावरील किल्ले जपानी फौजेनें घेतले.

तह करण्याविषयीं चीन फार उत्सुक दिसतो. कोरियाचा स्वतंत्रपणा कबूल करण्यास कांहीं प्रांत जपानास देण्यास व लढाईच्या खर्चाची रकम देण्यास आपण तयार आहों असें चीनानें अमेरिकन वकीलाच्या मार्फत जपानास कपानास कळविलें असें सांगतात.

सेंटपिटर्सबर्ग— तह करण्याच्या बाबतींत जपानच्या ज्या कांहीं अटी आहेत त्यांत मांचेरिया मोकथन व ग्रेड वॉल पर्यंत आह्मांस द्यावा अशी जपानाची एक अट आहे.

जपानच्या तहाच्या शर्ती काय आहेत हें अगदीं गुप्त राखण्यांत येत आहे.

गेल्या फेब्रुवारी महिन्यांत चीनांतील मांचूरिया प्रांतांत दुपारी ३॥ वाजतां आकाशांत तीन सूर्य दिसले. चीनांत मोंग एकदां असेंच तीन सूर्य दिसले होते व त्यावेळीं चीनच्या बादशहाचा खून झाला त्यावरून त्यांस हल्लींचा प्रकारही भयसूचक वाटत आहे.

सरहद्दीवरील लढाईच्या कामाकरतां ९० नव्या तोफा आणण्याचें हिंदुस्थान सरकारचें ठरल्यासारखें दिसतें.

युरोपातल्या मध्यभागांतल्या त्रिकूट राष्ट्रांशीं रशिया सामिल होणार नाहीं. कारण त्यांणीं फ्रान्सास तोंडांत टाकल्यावर रशियासही तोंडांत टाकण्यास तें तयार होतील हें रशिया जाणून आहे असें एका रशियन पत्राचें ह्मणणें आहे.

काकेशस प्रांतांत रशियाची जी फौज आहे त्या फौजेच्या मदती करतां रशियाची एक मोठी फौज आली असून ती तुर्कीची सरहद्द व अलेक्झांड्रापोल यांच्या दरम्यान पसरली आहे. रस्ते वगैरेंची दुरुस्ती चालली आहे. फार मोठा तोफखानाही कार्स व ओल्टोकडे रवाना झाला. लढाईचें सामानही त्याच्या बरोबर आहे. काकेशसच्या इतर भागांतही हत्याराची वगैरे तयारी चालली आहे. लोकांस राहाण्यास व सामानाच्या वखारींस इमारतीही तयार होत आहेत. कार्स किल्ल्यावर धान्याचाही साठा करण्यांत आला आहे.

आस्ट्रेलियाचें सरकार आपल्या राज्यकारभारांत काटकसर करीत आहे.

इंग्लंड सरकार आपल्या आरमाराची योग्य तितकी भरती करण्याच्या विचारांत आहे.

फ्रान्सची दोन लढाऊ गलबतें मादागास्करवर रवाना झालीं आहेत.

पोष्टाच्या टिकिटांवर हल्लीं राणीचा जो मुखवटा आहे तो तरुणपणाचा असून हल्लींच्या त्यांच्या खऱ्या चेहेऱ्यासारखा नाहीं, ह्मणून तो बदलून हल्लींच्या खऱ्या चेहेऱ्यासारखा करावा असा एक प्रश्न नुकताच पार्लमेंटपुढें आला होता.

वऱ्हाड प्रांत जो इंग्रज सरकारच्या ताब्यांत आहे त्या प्रांतांच्या जमेंतून खर्च वजा जाऊन जी शिल्लक राहाते ती निजामानें परत मागूं नये अशाबद्दल निझामावर सक्ती होत आहे हें ह्मणणें अगदीं खोटें आहे, व त्याचप्रमाणें निझामानें इंपिरियल कामाकरतां ह्मणून आपली जी फौज इंग्रज सरकारच्या स्वाधीन केली आहे त्या फौजेच्या खर्चाकरिता ह्मणून निझामानें दुसरा कांहीं प्रांत इंग्रज सरकारच्या स्वाधीन करावा अशा विषयीं निजामावर सक्ती करण्यांत येत आहे हें ह्मणणें खरें नाहीं असा मि० के यांच्या प्रश्नास स्टेट सेक्रेटरी मि० फौलर यांनीं पार्लमेंट सभेंत जबाब दिला. निझामाचा दुसरा कांहीं मुलूख सरकार आपल्या ताब्यांत घेण्याची खटपट करीत आहे अशी अलीकडे जी एक बातमी पसरली आहे ती खोटी आहे असें आतां या सवाल जबाबावरून होते व तें समाधानकारक आहे, पण हा सर्व प्रकार असा असतांही बातमी प्रथम बाहेर कशी आली याचा मोठा चमत्कार वाटतो. इंपिरीयल कामाकारितां दिलेल्या फौजेच्या खर्चाकरितां ह्मणून इंग्रसरकार निझामाजवळ जर प्रांत मागेल तर मग ज्या ज्या रजवाड्यांनीं आपल्या फौजा सरकारास दिल्या आहेत त्या त्या रजवाड्यांपासूनही सरकारास कमी जास्त मानानें मुलूख घेतां येईल; आणि तसें झालें ह्मणजे हें इंपेरियल काम ह्मणजे रजवाड्याचे लचुके तोडून इंग्रजी राज्य वाढविणेंच आहे असें होईल. अ० द०

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.